शनिवार, ४ नोव्हेंबर २०२३
किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
मराठी दैनिक
वर्ष - ०३ अंक - ८९
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

●MARATHI ●DAINIK ●CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) SATURDAY 4 NOV. 2023 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ●YEAR-03 ●ISSUE-89 ●RNI : MAHMAR/2021/82566 ●PAGE-12 ●PRICE-5


महत्त्वाची बातमी

## येत्या ४८ तासांत मुसळधार पावसाची शक्यता

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर:** देशातील हवामान गेल्या आठवडाभरापासून मोठा बदल होत आहे. पहाटे आणि रात्री थंडी, तर दिवस ऊन असे वातावरण आहे. पूर्वेकडून येणाऱ्या वाऱ्यांमुळे हवेतील गारवा वाढला आहे. त्यामुळे वातावरणात मोठा बदल झाला असून येत्या ४८ तासांत काही राज्यांमध्ये मुसळधार पाऊस होईल, असा अंदाज हवामान खात्याने वर्तवला आहे. तसेच हिमाचल प्रदेश आणि जम्मू-काश्मीरमध्ये बर्फवृष्टीचा देखील अंदाज आहे. देशातून मान्सून पूर्णपणे परतला मात्र, अजूनही तामिळनाडू आणि केरळच्या विविध भागात मुसळधार पाऊस सुरू आहे. गेल्या २४ तासांत अंदमान-निकोबार बेट, केरळ आणि तामिळनाडूमध्ये काही ठिकाणी मुसळधार पावसाची नोंद झाली. तर पुढील सात दिवसांत दक्षिण द्वीपकल्पीय भारतात पावसाच्या हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या सरी कोसळतील, असा इशारा हवामान खात्याने दिला आहे. खासगी हवामान संस्थेच्या अंदाजानुसार तामिळनाडू, केरळ, आंध्र प्रदेशचा दक्षिण किनारा, किनारी कर्नाटक आणि अंदमान आणि निकोबार बेटांवर काही ठिकाणी मुसळधार पावसाची शक्यता आहे. याशिवाय लक्षद्वीप, रायलसीमा आणि दक्षिण अंतर्गत कर्नाटकात पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. छत्तीसगड आणि ओडिशामधील काही जिल्ह्यांना पावसाचा इशारा देण्यात आला आहे. पश्चिम हिमालयात तीन नोव्हेंबरपर्यंत हलका पाऊस आणि हिमवर्षाव होण्याची शक्यता आहे.

# दुष्काळ जाहीर करताना भेदभाव

## विजय वडेट्टीवार : ४० पैकी ३५ तालुके सत्ताधारी आमदारांचे



आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** राज्य सरकारने दुष्काळ जाहीर करताना ज्या तालुक्यांची निवड केली त्यावरुन काँग्रेस नेते आणि विधानसभेचे विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी टीकेची झोड उठवली. दुष्काळ जाहीर करताना सरकारकडून भेदभाव करण्यात आला असून ४० पैकी ३५ तालुके सत्ताधारी आमदारांचे असल्याचा दावाही त्यांनी केला.

विजय वडेट्टीवार पुढे म्हणाले की, शेतकऱ्यांचे काय होईल ते होईल... पण मुख्यमंत्र्यांना पाठिंबा देणारे आमदार खुश असले पाहिजे, असच सरकारच्या निर्णयावरून दिसत आहे. दुष्काळ जाहीर केलेल्या चाळीस तालुक्यापैकी जवळपास ३३ ते ३५ तालुक्यांचे आमदार हे सत्ताधारी पक्षाचे असून त्यात काही मंत्र्यांचेही तालुके आहेत. विरोधी पक्षातील आमदारांच्या फक्त चार ते पाच तालुक्यांचा दुष्काळी तालुक्यात समावेश केला आहे, असे विजय वडेट्टीवार म्हणाले. सरकारने निकषाच्या खेळात शेतकऱ्यांना भरडून भेदभाव केला आहे. सरकारने दुष्काळ जाहीर करताना केलेला राजकीय भेदभाव अत्यंत खेदजनक आहे. किमान सरकारने शेतकऱ्यांच्या प्रश्नावर राजकारण करू नये. जत सारखे तालुके जिथे मोठा दुष्काळ आहे, तालुक्यात टँकर सुरू असून पाण्याची प्रचंड टंचाई आहे. पण यासारख्या अनेक तालुक्यांना डावलून सरकारने हा जुलमी निर्णय घेतला आहे, असे विजय वडेट्टीवार यांनी म्हटले.



**गंभीर स्वरुपाचा दुष्काळ असणारे तालुके**

**नंदूरबार :** नंदूरबार
**जळगाव :** चाळीसगाव
**जालना :** भोकरदन, जालना, बदनापूर, अंबड, मंठा
**छत्रपती संभाजीगनर :** छत्रपती संभाजीनगर, सोयगाव
**नाशिक :** मालेगाव, सिन्नर, येवला
**पुणे :** पुरंदर सासवड, बारामती
**बीड :** वडवनी, धारुर, अंबेजोगाई
**लातूर :** रेणापूर
**धारशिव :** वाशी, धाराशिव, लोहारा
**सोलापूर :** बार्शी, माळशिरस, सांगोला

**मध्यम दुष्काळाचे तालुके**

**धुळे :** सिंदखेडा
**बुलढाणा :** बुलढाणा, लोणार
**पुणे :** शिरुर घोडनदी, दौंड, इंदापूर
**सोलापूर :** करमाळा, माढा
**सातारा :** वाई, खंडाळा
**कोल्हापूर :** हातकणंगले, गडहिंग्लज,
**सांगली :** शिराळा, कडेगाव, खानापूर विटा, मिरज

# मनोज जरांगे पाटील यांची प्रकृती खालावली

आधुनिक केसरी न्यूज

**जालना :** मराठा नेते मनोज जरांगे पाटील यांची तब्येत बिघडल्याची बातमी शुक्रवारी सकाळीच समोर आली. त्यांच्या तब्येतीत अद्यापही सुधारणा झालेली नाही. याउलट त्यांची प्रकृती आणखी खालावल्याची माहिती समोर आली. त्यांची प्रकृती लवकर बरी व्हावी, अशी प्रार्थना मराठा समाजाकडून केली जात आहे. डॉक्टरांचे शर्थीचे प्रयत्न सुरु आहेत. उपोषणामुळे सलग 9 दिवस अन्न-पाण्याशिवाय राहिल्यामुळे जरांगे यांची तब्येत खालावली आहे. मनोज जरांगे यांनी उपोषण सोडल्यानंतर ते रात्री रुग्णालयात दाखल झाले होते. त्यांचा अशक्तपणा वाढला आहे. त्यांना रुग्णालयात



उलट्या देखील झाल्या आहेत. त्यामुळे चिंता व्यक्त केली जात आहे. जरांगे यांना उलट्या झाल्यानंतर डॉक्टर सतर्क झाले आहेत. डॉक्टरांकडून सर्व प्रकारची काळजी घेतली जात आहेत. जरांगे यांच्यावर छत्रपती संभाजीनगर येथील गॅलक्सी रुग्णालयात उपचार सुरु आहेत. त्यांचे रिपोर्ट्स आले आहेत. या रिपोर्ट्समध्ये मनोज जरांगे यांच्या किडनी आणि लिव्हरला सूज आल्याची माहिती समोर आली आहे. दरम्यान, मनोज जरांगे यांनी काल उपोषण सोडले. सरकारचे शिष्टमंडळ मनोज जरांगे यांची मनधरणी करण्यासाठी आले होते. या शिष्टमंडळाने मनोज जरांगेंना सर्व कायदेशीर बाजू समजावून सांगितली. त्यानंतर मनोज जरांगे यांनी सरकारला 24 डिसेंबरपर्यंतचा वेळ दिला आहे. मंत्री धनंजय मुंडे यांच्या हातून ज्यूस पिवून जरांगे यांनी काल संध्याकाळी उपोषण सोडले. त्यानंतर त्यांना रात्री रुग्णालयात दाखल करण्यात आले होते.

# शर्मिला रेड्डींची माघार


आधुनिक केसरी न्यूज

**हैदराबाद :** तेलंगणा विधानसभेच्या निवडणुकीसाठी ३० नोव्हेंबरला मतदान होणार आहे. तर, ३ डिसेंबरला मतमोजणी पार पडणार आहे. ११९ जागांसाठी होणाऱ्या निवडणुकीत सत्ताधारी भारत राष्ट्र समिती ( पूर्वीची तेलंगणा राष्ट्र समिती ) आणि काँग्रेसमध्ये अटीतटीची लढाई होत आहे. आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री जगनमोहन रेड्डी यांची धाकटी बहीण वायएसआर तेलंगणाच्या प्रमुख वायएस शर्मिलाही निवडणुकीच्या रिंगणात उतरल्या होत्या. पण, वायएस शर्मिला यांनी आता मोठा निर्णय जाहीर केला आहे. तेलंगणा विधानसभा निवडणूक न लढण्याचा निर्णय वायएस शर्मिला यांनी घेतला आहे. मतांचे विभाजन टाळण्यासाठी काँग्रेसला पाठिंबा देणार असल्याचे शर्मिला यांनी सांगितले.











विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

# मनोरथा चल त्या नगरीला...!

आधुनिक केसरी

कर्नाटकमध्ये विजयनगर जिल्ह्यात होस्पेट ( ज्याचे नावही आता विजयनगर करण्यात आले आहे ) नावाचं छोटंसं गाव आहे. या होस्पेट गावाजवळ हंपी नावाचं ठिकाण आहे. माझे एक स्नेही श्री ए एम गुरुमूर्ती हे होस्पेटला राहतात. ते बऱ्याच वर्षांपासून आम्हाला त्यांच्याकडे यावं म्हणून आग्रही होते. अखेर ४ जून २०२२ ला तो योग जुळून आला. कर्नाटकातच बदामी येथे असलेली शाकंभरी देवी ही आमची कुलदेवता असल्याने तिच्या दर्शनासाठी आम्ही बदामीला गेलो. मी, माझी पत्नी सौ श्रद्धा, मुलगी सारिका आणि नातू स्वराज असे आम्ही चौघेजण कारने आधी सोलापूरला आणि मग दुसऱ्या दिवशी बदामीला गेलो. बदामीचा परिसर अतिशय निसर्गरम्य आहे. जवळच पट्टदकल आणि ऐहोळ येथील पुरातन मंदिरे व लेणी आहेत. आम्ही देवीचे दर्शन घेऊन बाहेर पडतो न पडतो तोच आम्हाला घ्यायला श्री गुरुमूर्ती सर होस्पेटहून तिथे हजर होते. गुरुमूर्ती सरांबद्दल मी पुढच्या भागात सविस्तर लिहिणार आहे. एक अतिशय लोभस आणि हवंहवंसं वाटणारं व्यक्तिमत्व म्हणजे गुरुमूर्ती ! त्यांच्यामुळेच हंपी हे पुन्हा एकदा पाहण्याचा योग जुळून आला. हंपी ही पूर्वी म्हणजे १४ व्या शतकात विजयनगर साम्राज्याची राजधानी होती. आज आपण जेव्हा हंपी बघायला जातो तेव्हा आज भग्नावस्थेत दिसणारे हे शहर एके काळी किती वैभवशाली असेल याची कल्पना येते. हंपी हे शहर तुंगभद्रा नदीच्या काठावर वसलेले आहे. याच शहराला पूर्वी पंपा किंवा किष्किंधा किंवा भास्करक्षेत्र म्हणून ओळखले जात होते. पंपा हे पूर्वी तुंगभद्रा नदीचे एक नाव होते. त्यावरूनच पुढे हंपी असे झाले असावे. यालाच विजयनगर किंवा विरुपाक्षपुरा असेही म्हटले जाते. हंपीत प्रवेश केल्यानंतर जागोजागी अजस्त्र शिळा आपल्या दृष्टीस पडतात. अजस्त्र शिळा असलेल्या टेकडया आहेत. हेच अतिभव्य असे पाषाण जागोजागी पण विखुरले आहेत. काही ठिकाणी त्यांच्या नैसर्गिक गुहा, आडोसा तयार झालेला आहे. त्याआधाराने काही लोक राहत आहेत.





# आनंदी पहाट

## जीवनातील सौंदर्याच्या जागा माहिती करून घ्याव्यात

आधुनिक केसरी



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

आपली सजगता, सतर्कता आणि सौंदर्यदृष्टी यांचा मिलाफ आपण आपल्या जीवनात घडवून आणू शकतो. मनात घर करून राहिलेल्या आपल्या प्रतिमेला आपल्या मनाइतकंच सुंदर सजवायचं, खुलवायचं असतं. प्रतिमा छोटी असली तरीही चालेल पण त्याला सजवणारं मन मात्र मोठं असावं लागतं. आपल्या छोट्या प्रतीमेतूनच मोठ्या मनानं सौंदर्याचा साक्षात्कार घडवायचा असतो, त्यातच जीवनातलं सार सामावलेलं असतं. सुंदरता, ही आपल्या प्रत्येक गोष्टीकडे बघण्याच्या दृष्टीकोनावर अवलंबून असते. प्रत्येक व्यक्तीच्या व्यक्तिमत्वाचा संबंध त्या व्यक्तीच्या मानसिकतेशी निगडीत असतो. आपापली अपेक्षा, गरज, उपजत कलागुण, छंद, आवड, निवड, सवड, वैचारिक क्षमता, सामजिक स्थान, व्यावसायिक संबंध, कौटुंबिक आकार, शैक्षणिक पात्रता, आर्थिक कुवत तसेच याव्यतिरिक्त इतर सर्व लौकिक आणि अलौकिक गुण ह्या सर्व बाबींवर आपलं व्यक्तिमत्व बाहय तसेच अंतर्गत कसं असू शकेल, हे ठरतं. आपल्या राहणीमानात एकप्रकारे आपलं व्यक्तिमत्व ऐट अणू शकतं. कल्पक आणि सौंदर्यपूर्ण सकारात्मक विचार, आचार आणि व्यवहार करणारं मन निश्चितच आपल्या जीवनात सौदर्याचा साक्षात्कार घडवून आणू शकतं. आपल्या स्वप्नातल्या व्यक्तिमत्वाचं वेगळेपण अनुभवताना, त्यासाठी जीवनशैली निवडताना आपल्या आशा, अपेक्षा, इच्छा. ईर्षा, उन्नती, संपन्नता यांच्या परिपूर्णतेसाठी प्रत्येक बाबींचा विचार करणं आवश्यक असतं. खरं म्हणजे, आपली, आपल्या कुटुंबाची खरी ओळख आपआपल्या व्यक्तिमत्वावरूनच होत असते. आपल्या जीवनामधील सौंदर्याचं स्थान आणि महत्व हे तेव्हाच आपण अनुभवू शकतो. आनंद मिळवून जीवन जगण्यातच आपलं मनःस्वास्थ्य टिकून राहू शकतं. निस्वार्थी प्रेमाची जाणीव असणं हे आपल्या आनंदाच्या प्राप्तीसाठी जरुरीचं असतं.



आधुनिक केसरी

**आता काय तमा | संसाराची ||**
सुख दुःख भय | आता काय त्याचे ||
विठ्ठल आमुचे | निजस्थान ||१||
क्षुधा तृष्णा सारी | देहासाठी उरे ||
विठुची लेकुरे | झालो आम्ही ||२||
हरिपाठ नित्य | घेती संतजन ||
काया वाचा मन | एक विठु ||३||
आत्म्याच्या अंतरी | भक्तीचा पाझर ||
कर्माचा जागर | शुद्ध झाला ||४||
विरक्तीची वस्त्रे | नेसविली आम्हा ||
आता काय तमा | संसाराची ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८


# निरूपण

आधुनिक केसरी

सुंन्याकार जाली वृत्ती ।कांहीं आठवेना चित्तीं ।
अज्ञानें पडिली भ्रांती ।तेणें सुखचि मानिलें ॥४९॥देह विकार
पावलें ।सुखदुःखें झळंबळे ।
असो ऐसें गुंडाळलें ।मायाजाळीं ॥५०॥
ऐसें दुःख गर्भवासीं ।होतें प्राणीमात्रांसीं ।
म्हणोनियां भगवंतासी ।शरण जावें ॥५१॥

# घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

दुर्लभ सद्गुरु मिलन है, ऊठो जागो धाय ।
सद्गुरु खोजो शरण लो, दाव चूक नहिं
जाय ।।४५।।(स्वर्वेद पंचम मण्डल त्रयोदश
अध्याय) ०५/१३/४५
मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :
या जगात सद्गुरु भेटणे दुर्लभ आहे. म्हणून उठा, जागे व्हा आणि धावत जाऊन सद्गुरूंचा शोध घ्या आणि त्यांना शरण जा. वारंवार अशी संधी मिळत नाही. म्हणून चुकूनही हा उत्तम समय निघून जाता कामा नये. त्यामुळे आपल्या जीवनाच्या कल्याणासाठी त्वरित सद्गुरूंना शरण जाऊन प्रभूची भक्ती करावी.



स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.

# शारदीय नवरात्र (माळ सातवी)

आधुनिक केसरी


तर काही जण त्याच आवेशाने रणवाद्यांच्या तालावर थैमान घालून थयथय नाचत होते. जगदंबा माता दैत्यांना गवताची पाती तोडावी त्याप्रमाणे त्यांना चिरडून काढत होती. अग्नी ज्याप्रमाणे वाळलेले गवत,लाकुड क्षणात नष्ट करतो त्याप्रमाणे राक्षसांचा नाश केला. देवीच्या हिंद केसरीने ही भल्याभल्यां वीरांना आपली आयाळ हलवून घाबरवून त्यांच्या माना तोडल्या देवीच्या बरोबरीने अखंडपणे लढून आपला पराक्रम दाखवला. देवगण सुध्दा पराक्रम करण्यात मागे नव्हते. अर्थात देवीची प्रेरणा त्यांच्या मागे ऐवढी होती की ते अप्रतिम, अद्वितीय कार्य करू शकले. हा हृद्य सोहळा देव मोठ्या उत्साहाने पहात होते,देवीने राक्षसांवर मिळवलेल्या विजयामुळे देव आनंदीत झाले, त्यांनी आकाशातून फुलांचा वर्षाव केला. महिषासुर राक्षसांचा वध देवीने केला म्हणून महिषासुरमर्दिनी असे म्हणतात. अशा या दुष्टम्लेंच्छाविनाशिन्यें मातेला माझा वारंवार नमस्कार असो. सर्व मंगलसज्ञिताये नमः आई राजा उदो उदो



सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

# संत 'तू भगवंताचा आहेस' ही जाणीव देतात

आधुनिक केसरी



आपण कोणतेही कृत्य करीत असताना, ज्याकरिता ते कृत्य आरंभिले ते जसे आपल्या डोळ्यासमोर असते, त्याप्रमाणे नाम घेताना, आपण नाम कशाकरिता घेतले त्याची अखंड जाणीव असावी. ही जाणीव अखंड ठेवणे, मी भगवंताचा आहे हे जाणणे, याचे नाव अनुसंधान ठेवणे. वास्तविक आपण भगवंताचे आहोतच, पण मी विषयाचा आहे असे भ्रमाने वाटू लागले. संत 'तू विषयाचा नाहीस, भगवंताचा आहेस' असे सांगतात. हीच संतांची खरी कामगिरी, आणि याकरिता ते नाम घ्यायला सांगतात. नाम घेणे म्हणजे 'मी विषयाचा नाही, भगवंताचा आहे' असे मनाला सांगणे आणि मनात तशी जाणीव उत्पन्न करणे; आणि ही जाणीव टिकविण्याकरिता पुनः पुनः मनाला तेच सांगणे, म्हणजे तेच नाम सतत घेणे. तुम्हाला रामदर्शन पाहिजे म्हणता, पण राम तुम्हाला ओळखता कसा येणार ? रामदर्शन व्हायला रामाचे अंतर काटता आले पाहिजे; रामाला पक्के ओळखता आले पाहिजे. याकरिता अंतःकरणाची पवित्रता पहिजे; शुद्ध भाव पाहिजे. सर्व काही साधने केली, पण भाव नसेल तर ती व्यर्थ होतात. कालांतराने त्यामुळे भाव उत्पन्न होईल हे खरे, पण भाव ठेवून साधने केली म्हणजे प्राप्ती लवकर होते. नवविधा भक्तीमध्ये सोपी आणि मुख्य भक्ती म्हणजे अर्पण करणे ही होय. आपण सर्वस्वी देवाचे होऊन राहावे म्हणजे आपण जे काही करतो ते सर्व अर्पणच होते. ज्याने त्याने आपले हित ओळखून वागणे हे जरूर आहे. कल्याणाचा मार्ग कुणीही दाखवील, पण त्याप्रमाणे वागणे हे ज्याचे त्याच्याकडे आहे. बंधनाला खरे कारण परिस्थिती नसून आपल्याच मनाची ठेवण ही आहे. कोणत्याही परिस्थितीत, कोणत्याही काळात आणि वाटेल त्या अवस्थेत घेण्यासारखे एक भगवंताचे नाम तेवढे आहे. आहे त्या परिस्थितीत पूर्ण समाधान राहणे ही देवाची पूर्ण कृपा होय. अग्नीचा उपयोग तो करून घेणाऱ्यावर आहे; तसा देवाचा उपयोग जसा करावा तसा होतो. परमेश्वराच्या ध्यानाने सिद्धी येतात आणि सिद्धी तर त्याज्य; मग परमेश्वराचे ध्यान करूच नये की काय ? तर ध्यान हे सिद्धी मिळविण्यासाठी करू नये. परमेश्वर-प्राप्तीकरिता निष्कामबुद्धीने ध्यान करावे, म्हणजे परमेश्वर सिद्धीचे अडथळे दूर करतो. साधू सिद्धींचा उपयोग कधीही करीत नाहीत; ते परमात्मस्वरूपात मिळून गेलेले असतात. सर्व गोष्टी ते परमात्म्यावर सोपवितात आणि त्यांच्या इच्छेनेच केव्हा केव्हा चमत्कार झाल्याचे साधूंच्या चरित्रात दिसते.

# संत मुक्ताबाई

तात आणि माता गेलीसे येथून| तेव्हा आम्ही लहान पांडुरंगा
निवृत्ती ज्ञानेश्वर कोरान्नाचे अन्न | सांभाळी सोपान मजलागी
तुझ्या योगे हरी क्रमियेला काळ मुक्ताबाईच्या हातून ही विश्व उद्धाराचे कार्य घडले. योगी चांगदेव एवढा मोठा तपस्वी होता. पण त्याने गुरु केला नसल्याने त्याला ईश्वरदर्शन झाले नव्हते. मुक्ताबाईंनी योगी चांगदेवाना 'पासष्टी' चा अर्थ उलगडून दाखविला. मुक्ताबाईच्या अनुग्रहाने चांगदेवाना आत्मरुपाची प्राप्ती झाली, तेव्हा त्यांचे १४०० वर्षाचे आयुष्य धन्य झाले. "आठ वर्षाची मुक्ताई १४०० वर्षाच्या चांगदेवांची अध्यात्मिक गुरु बनली." कृतार्थतेने चांगदेव म्हणतात, "मुक्ताई करे लेइले अंजन". ज्ञानेश्वरांनी एकदा मुक्ताबाईला मांडे बनवण्यास सांगितले. त्याकरता मुक्ताबाई मातीचे खापर आणण्यासाठी कुंभारवाड्यात गेली. विसोबा चाटी हा त्या गावाचा प्रमुख होता जो या चार भावंडांचा द्वेष करत असे. त्याने मुक्ताबाईला कोणीही खापर देऊ नये अशी गावात ताकीद केली.

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक
शनिवार, ४ नोव्हेंबर २०२३



मागास जातीतील महिला शास्त्रज्ञ! पान ६



जागर स्त्री शक्तीचा पान ७

# नावली ग्राम पंचायत सरपंचपदी गजाननराव बाजड

आधुनिक केसरी न्यूज

**वसंत खडसे**

**वाशिम :** शांत व प्रसन्न मन हे शेवटचे असे हत्यार आहे की, जे जीवनातील 'कोणत्याही प्रकारच्या आव्हानांना' सामोरे जाण्यास सज्ज असते या तत्त्वावर चालणारे नावली येथील सरपंच गजाननराव बाजड यांची पुन्हा एकदा गावकऱ्यांनी अविरोध म्हणून सरपंचपदी निवड केली आहे गजाननराव बाजड हे गेल्या वीस वर्षापासून ग्रामपंचायत मध्ये सदस्य सरपंच पुन्हा सरपंच म्हणून कार्यरत आहेत त्यांची दुसऱ्यांदा सरपंच म्हणून वर्णी लागली असून त्यांचे सर्वत्र कौतुक होताना दिसत आहे.नावली गावची लोकसंख्या जेमतेम 2000 गेल्या वीस वर्षापासून गजानन राव बाजड यांनी नावली गावांमध्ये विकासाची गंगा खेचून आणली विविध कामे मार्गी लावले त्यांच्या याच कार्याची दखल घेऊन गावकऱ्यांनी त्यांना पुन्हा एकदा सरपंच पदी विराजमान झाले आहे. निवडणूक प्रक्रिया 3 नोव्हेंबर 2023 वार शुक्रवार रोजी संपन्न झाले असून निवडणूक निर्णय अधिकारी श्रीकुलमेथे तलाठी मोरे ग्रामसेवक रेखे यांच्या प्रमुख उपस्थिती वने निवडणूक संपन्न झाले असून अविरोध निवडणूक पार पडली निवडणुकी शांततेत पार पडली असून ठाणेदार चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली बीड जमदार ठाकरे यांनी चोख बंदोबस्त पार पाडला. यावेळी ग्रामपंचायत सदस्य उपस्थित होते गजाननराव बाजड निवडून आल्यानंतर निवडणूक निर्णय अधिकारी यांनी नवनिर्वाचित सरपंच यांचा सत्कार केला त्यानंतर गावातील गावकऱ्यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये नवनिर्वाचित सरपंच गजाननराव



बाजड यांचा सत्कार करण्यात आला आहे छत्रपती शिवाजी महाराज यांचा आशीर्वाद घेऊन व श्रीनाथ स्वामी महाराज यांचे दर्शन घेऊन मी गावासाठी व गावाच्या हितासाठी सदैव कटिबद्ध राहील असे यावेळी नवनिर्वाचित सरपंच गजाननराव बाजड यांनी सांगितला आहे. या परिवाराची विशेष ओळख म्हणजे दोन जुळे भाऊ एक सरपंच आणि एक पोलीस पाटील संपूर्ण गावचे धुरा दोन भावांच्या खांद्यावर गावकऱ्यांनी सोपवली असून गावाचा विकास कामासाठी आणि गावांमध्ये शांतता राहण्यासाठी आम्ही सदैव प्रयत्न करत राहू असे पोलीस पाटील श्रीधर पाटील बाजड आणि सरपंच गजाननराव बाजड यांनी सांगितले आहे.
नवनिर्वाचित सरपंच यांच्या परिवाराची पार्श्वभूमी परिवार हा अतिशय सुशिक्षित असून समाजसेवेची जाण असणारा आणि गोरगरिबांसाठी सदैव कटिबद्ध असणारा हा परिवारातून गावकऱ्यांनी त्यामुळेच पुन्हा एकदा गजाननराव बाजड यांची सरपंच पदी वर्णी लावली आहे त्यांचे आता सर्वत्र कौतुक होतांना दिसत आहे.

## रमेश शिंदे यांना विश्वकर्मा गुणवंत कामगार पुरस्कार

आधुनिक केसरी न्यूज



**छत्रपती संभाजीनगर :** महावितरणच्या छत्रपती संभाजीनगर परिमंडलातील कर्मचारी रमेश काकासाहेब शिंदे यांना महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळातर्फे विश्वकर्मा गुणवंत कामगार पुरस्कार महाराष्ट्राचे राज्यपाल रमेश बैस यांच्या हस्ते मुंबईत एक खास समारंभात प्रदान करण्यात आला. यावेळी कामगारमंत्री डॉ. सुरेश खाडे, शिक्षणमंत्री दीपक केसरकर, प्रधान सचिव (कामगार) विनिता वेद-सिंघल, कामगार कल्याण आयुक्त रविराज इळवे यांची प्रमुख उपस्थिती होती. रोख 25 हजार रुपये, मानपत्र, स्मृतीचिन्ह व पदक असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. शिंदे यांनी आई लीलाबाई, वडील काकासाहेब व पत्नी सुनीता यांच्यासह हा पुरस्कार स्वीकारला. महावितरणमध्ये 2011 पासून काम करणारे शिंदे सध्या हिवरा 33 केव्ही उपकेंद्रात यंत्रचालक म्हणून कार्यरत आहेत. महावितरणमधील उत्कृष्ट तांत्रिक कामांसोबतच सामाजिक, सांस्कृतिक योगदानाबद्दल त्यांना हा पुरस्कार देण्यात आला. ते छत्रपती संभाजीनगर तालुक्यातील वाहेगाव देमणी येथील रहिवासी आहेत. महाविद्यालयीन स्तरावर आपल्या अभिनय कौशल्याने विविध युवक महोत्सव, राष्ट्रीय आंतरविद्यापीठ स्पर्धा गाजवणाऱ्या शिंदेंनी महावितरणसह कामगार नाट्य स्पर्धा व राज्य नाट्य स्पर्धांतही विविध पारितोषिके पटकावलेली आहेत. उत्कृष्ट व्याख्याता, निवेदक, सूत्रसंचालक असलेल्या शिंदेंचे 'उद्योगाचा कणा : कामगार आणि वास्तव' हे पुस्तक प्रकाशित झालेले असून. कवितासंग्रह प्रकाशनाच्या वाटेवर आहे. कामगार चळवळीतही ते सक्रीय आहेत.

याआधी शिंदे यांना फेब्रुवारी 2023 मध्ये मिरज येथे झालेल्या कामगार साहित्य संमेलनात कामगार कल्याण मंडळातर्फे वैचारिक लेखन व काव्य लेखनासाठी राज्यस्तरीय साहित्य पुरस्कार प्रदान करण्यात आलेला आहे. तसेच 1 मे 2023 रोजी महावितरणच्या परिमंडल कार्यालयातर्फे त्यांना सहव्यवस्थापकीय संचालकांच्या हस्ते विशेष गुणगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. गतवर्षी महावितरणतर्फेच त्यांना उत्कृष्ट तांत्रिक कामगार पुरस्कारही मिळालेला आहे.

## किनगाव फाटा ते लोणी हायवे मार्चनंतर

आधुनिक केसरी न्यूज

**बाजार सावंगी :** खुलताबाद तालुक्यातील बाजार सावंगी येथुन नव्याने पुन्हा महामार्ग (हायवे) रस्ता करण्याचा प्रस्ताव असल्याने येथे बाजार पेठ दुकानदारात एकच खळबळ उडाली आहे.

करमाड ते कन्नड ( हायवे) महामार्ग रस्ता करण्याचा शासनाचा प्रस्ताव आहे. यात किनगाव फाटा ते लोणी चिकलठाणा कन्नडपर्यंत रस्ता बाजार सावंगी मार्गे येथुन जात आहे. यापूर्वीच बाजार सावंगी येथे मुख्य बाजार पेठ ते जिल्हा परिषद शाळा पर्यंत सिमेंट रुंदीकरण करत रस्ता करण्यात आला आहे.याकामा दरम्यान व्यापाऱ्यांनी दुकाने मागे घेतली होती.येथे ग्रामपंचायत अंतर्गत गावठाण व महसुल विभाग अंतर्गत नदीकाठी दोन्ही बाजूला दुकाने आहे.आता पुन्हा नव्याने सार्वजनिक बांधकाम विभाग अंतर्गत किनगाव फाटा ते लोणी पर्यंत त्यापुढे कन्नड पर्यंत ( हायवे) महामार्ग प्रस्तावीत केला असुण वर्ष -२०२४ मार्च दरम्यान या रस्त्या कामाला सुरुवात होणार असुण (हायवे) महामार्ग कमीत कमी ५०फुट तथा अधिकाधिक १००फुट करण्याचा प्रस्ताव असल्याचे दैनिक आधुनिक केसरी न्युज चे वार्ताहर सोबत बोलताना सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपाभियंता कोलते यांनी सांगितले. याकामासाठी मोजमाप नुकतेच करण्यात आले आहे.तर मार्च मधे काम हाती घेण्याचे बोलले जात आहे.या काम रूंदीकरण ला घेवून येथील व्यापाऱ्यात एकच खळबळ उडाली आहे. याचीच सद्या चर्चा सुरु आहे. ५०वा १०० रुंदीकरण झाले व्यापाऱ्यांना याचा फटका बसणार हे निश्चित.

## महिला तंत्रज्ञास धमकी, एकावर गुन्हा दाखल

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** थकबाकीपोटी वीजपुरवठा खंडित केला म्हणून महावितरणच्या महिला तंत्रज्ञास अरेरावी करत धमकी देणाऱ्या ग्राहकावर सिटी चौक पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शहागंज शाखेतील वरिष्ठ तंत्रज्ञाने चेलीपुऱ्यातील सरदार पटेल रोडवरील वीजग्राहक पी.नरहरी यांचा वीजपुरवठा वीजबिल थकीत असल्याने खंडित केला. चार महिन्यांपासून या ग्राहकाने वीजबिल भरलेले नाही. यावरून सदरील ग्राहकाने अरेरावीची भाषा वापरून मारहाण करण्याची धमकी दिली. त्यामुळे महिला तंत्रज्ञाच्या फिर्यादीवरून गुन्हा नोंदवण्यात आला आहे.



## मराठा समाजाचे अनोखे आंदोलन

### पाचेगाव ते जिंतूर अर्धनग्न पायी पदयात्रा

आधुनिक केसरी न्यूज

**जिंतूर :** तालुक्यात मराठा समाजाचे आरक्षण मागणीसाठी ठीक ठिकाणी विविध प्रकारचे आंदोलन करण्यात येत आहेत याच आंदोलन पाठिंबा देण्यासाठी पाचेगाव, मानधानी, रेपा, भोगाव, पुंगळा गावातील सकल मराठा समाजाच्या वतीने तब्बल 16 की मी पायी चालत अनोखे अर्धनग्न आंदोलन करत विविध मागण्यांचे निवेदन दि. 3 नोव्हेंबर रोजी देण्यात आले. मराठा समाजाला ओबीसी प्रवर्गातून सरसगट कुणबी प्रमाणपत्र देण्याच्या मागणीसाठी संपूर्ण राज्यात विविध आंदोलन करण्यात येत आहेत दरम्यान काल राज्य सरकारने उपोषणकर्ते मनोज जरांगे पाटील यांना कायद्याच्या कसोटीवर टिकणारे आरक्षण देण्यासाठी दोन महिन्याचा वेळ देऊन उपोषण सोडण्यात आले मात्र साखळी उपोषण,नेत्यांना गावबंदी कायम ठेवण्याचे जाहीर करण्यात आले आहे म्हणून जिंतूर तालुक्यातील पाचेगाव,रेपा, मानधानी,भोगाव,पुंगळा गावातील सकल मराठा समाजाच्या वतीने पद यात्रा काढून अर्धनग्न आंदोलन करत तब्बल 16 किमी प्रवास करून पद यात्रा तहसील कार्यालयात निवेदन देण्यात आले आहे निवेदनात सरसगट मराठा समाजाचा ओबीसी प्रवगातून कुणबी प्रमाणपत्र देण्यात यावे आत्महत्याग्रस्त कुटुंबाला 50 लक्ष रुपयांची आर्थिक मदत करण्यात यावी आंदोलना दरम्यान दाखल करण्यात आलेले गुन्हे मागे घेण्यात यावे, आत्महत्याग्रस्त कुटुंबाला घर बांधून द्यावे अशी मागणी करण्यात आली. या आंदोलनात मोठ्या प्रमाणात नागरिक उपस्थित होते.



## तारीख पे तारीख

आधुनिक केसरी

डी. वाय. चंद्रचूड यांनी खटल्यांची सुनावणी टळणे आणि लांबणे यावर चिंता व्यक्त केली आहे. यावेळी त्यांनी सनी देओलच्या दामिनी सिनेमातील 'तारीख पे तारीख' या संवादाचीही आठवण करुन दिली. आम्हाला असे मुळीच वाटत नाही की तारीख पे तारीख असाच न्यायालयाचा अर्थ काढला जावा. जर आवश्यकता असेल तरच सुनावणी पुढे ढकलली पाहिजे. मी जी माहिती मागवली आहे त्यानुसार आत्तापर्यंत १७८ प्रकारणे टाळण्याची, पुढे ढकलण्याची मागणी करण्यात आली आहे. ऑक्टोबर महिना संपला तोपर्यंत ३ हजार ६८८ प्रकरणात ही मागणी झाली आहे. ही बाब चिंताजनक आहे, असेही चंद्रचूड यांनी म्हटले आहे. प्रकरणांची सुनावणी टळली किंवा लांबली तर मग सुनावणी लवकर घेण्याचा हेतूच अपयशी ठरतो. जर तारीख पे तारीखच मिळत राहिली तर लोकांचा न्याय व्यवस्थेवरचा विश्वास उडून जाईल. मी सगळ्यांना हे आवाहन करतो आहे की जर गरज नसेल तर पुढची तारीख देऊ नका, सुनावणी लांबवू नका किंवा टाळू नका. सरन्यायाधीश डी. वाय चंद्रचूड म्हणाले सप्टेंबर महिन्यात २३६१ प्रकरणं अशी आहेत ज्यामध्ये पुढची तारीख मागण्यात आली आहे, अशा प्रकारची मागणी करणे हेच चुकीचे आहे, अशा प्रकारे तारखाच पडत राहिला तर लोक न्यायालय म्हणून आपल्यावर विश्वास कसा काय ठेवतील? महत्त्वाची बाब ही आहे की आत्ताच नाही तर याआधीही सरन्यायाधीश डी. वाय. चंद्रचूड यांनी तारखा पडण्यावरुन एका वकिलाला खडे बोल सुनावले होते. तसंच चंद्रचूड यांनी एका वकिलाला कोर्टात मोबाइलवर बोलत असल्याच्या कारणावरुनही तंबी दिली होती. हे न्यायालय नाही तर बाजार आहे तुम्ही इथे फोनवर बोलू नका, यांचा फोन जप्त करा, असे म्हणत न्यायालयाच्या कर्मचाऱ्यांकडून त्यांचा फोनही जप्त करण्याचा आदेश चंद्रचूड यांनी दिला होता.



विनोद सदावर्ते
संपर्क क्र. 9130979300

## आंदोलनाचा लढा सरकार वाढवतेय तिढा

आधुनिक केसरी

**मनोज जरांगे यांनी प्रस्थापित नेत्यांना डावलून समाजातील प्रश्न उचलून घेऊन प्रस्थापित लोकांपेक्षा कितीतरी पटीने मान सन्मान आणि जनसमर्थन मिळवले आहे. कोणत्याही पक्षाचे संघटनेचे नाव न घेता लाखों लोकांना एकत्र करणे साधी गोष्ट नाही. मंत्र्यांच्या कार्यक्रमाला प्रशासनाला गर्दी जमण्याचे टार्गेट देऊनही गर्दी जमत नाही परंतु मनोज जरांगे यांच्या एका शब्दांवर लाखों लोक एकत्र येऊन जरांगे म्हणतील तस करायला तयार आहेत. याचे एकच कारण आहे ते म्हणजे सत्तर वर्षात प्रस्थापित नेत्यांनी समाजासाठी काहीच केले नाही. समाजाच्या समस्या न सोडवता स्वतः च्या संपती मध्ये वाढ करून समाजाला वैचारिक व विकासाच्या अंधारात ठेवले.**

परंतु मनोज जरांगे यांनी केवळ एकच मुद्दा उचलून धरून त्यावर ठाम राहिल्याने ज्यांच्या दोन दोन पिढ्या राजकारणात गेल्या त्या सर्वांना घाम फोडला. लोकांचा नेता याला म्हणत असतात. सर्वसामान्य कुटुंबातील व्यक्तीने अनेक वर्षें सत्तेत असलेल्या लोकांना जनसमर्थनावर घाम फोडणे खरचं सोपी गोष्ट नाही. मनोज जरांगे यांच्या आंदोलनाला सरकार व इलेक्ट्रॉनिक मिडिया थोडे वेगळे स्वरूप देऊन आंदोलनाचा तिढा वाढवण्याचा प्रयत्न करत आहे. मुळात जरांगे यांची साधी मागणी आहे की ज्यांच्या कागदपत्रावर मराठा आहे त्यांना कुणबीचे प्रमाणपत्र द्या. या पेक्षा वेगळी मागणी नाही. आणि मराठ्यांना कुणबी प्रमाणपत्र देण्याची मागणी चुकिची नाहीच. मराठा हेच कुणबी आहेत. मग अगोदरच्या काळात अज्ञान पणाने किंवा इतर काही कारणाने बऱ्याच लोकांनी कुणबी जात न लिहता मराठा जात लिहली. परंतु सरकार जर न्यायीक, अभ्यासु आणि मानवतावादी असेल तर एवढे तर कळायला पाहिजे कि मराठा हा जातीचा शब्द नाही तर समुहाचा शब्द आहे. महाराष्ट्रात राहणाऱ्यांना मराठा संबोधले गेले याचे अनेक दाखले इतिहासात आहेत. एवढेच काय तर राष्ट्रगीतामध्ये मराठा हा प्रांतीक शब्द असल्याचे स्पष्ट लिहले आहे. पंजाब, सिंधु, द्रविड, मराठा असा स्पष्ट उल्लेख राष्ट्रगीता मध्ये आहे. आणि दररोज आपण तो उच्चारतो देखील. म्हणून पुर्वीच्या काही लोकांनी केलेल्या चुकिमुळे आजच्या लोकांना शिक्षा का? हा सरळ प्रश्न जरांगे च्या आंदोलनातुन सरकार ला आहे. मराठा कुणबी एकच असताना मराठ्यांना कुणबीचे प्रमाणपत्र देण्याची अडचण नेमकी आहे कुठे? मराठा हा प्रांतिक शब्द असल्याने तो शब्द जात कशी होणार? जाती प्रधान देशात माणसाला जात असतेच मग कुणबी ही मराठ्यांची जात नसेल तळ मराठ्यांची जात कोणती? हे प्रश्न उपस्थित राहतात. परंतु आपण प्राथमिक पातळीवर जरी बघितले तरीही लक्षात येते मराठा हेच कुणबी आहेत. मग त्यांना कुणबीचे प्रमाणपत्र देण्यासाठी एवढी ओढाताण कशासाठी? अनेकांचे जिव गेले, सरकाच्या चुकीच्या विचारामुळे आंदोलनाला हिंसक वळण लागले, अनेक तरुणांवर गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल झाले, आमदारांचे घरे जळाली, शासकीय मालमत्तेचे नुकसान झाले. एक साधे असलेले आंदोलन व्यापक झाले. जरांगे सह आंदोलक घटनाबाह्य कींवा चुकिची मागणी करत नसताना झालेल्या परिणामाला जबाबदार कोण? ज्यांचे आहे त्यांना च मिळत नसेल म्हणून लोक रस्त्यावर आले. हक्क अधिकार मिळत नसतील तर रस्त्यावर उतरण्याचा अधिकार लोकांना



आहे. परंतु लोकांनी रस्त्यावर उतरूच नये यासाठी सरकार लोकहिताचे काम का करत नाही? लोकांचे प्रश्न सोडवल्या गेले नाही तर रस्त्यावर उतरलेल्या लोकांवर गंभीर स्वरुपाचे गुन्हे दाखल करून सरकारला नेमकं काय साध्य करायचे आहे असे अनेक प्रश्न उपस्थित होतात. सरकार जेव्हा मराठ्यांना कुणब्याचे प्रमाणपत्र देताना टाळाटाळ करून आंदोलन दाबण्याचे प्रयत्न करते तेव्हा मराठा समाजातील कुणबीचे प्रमाणपत्र घेऊन आरक्षणाचा लाभ घेतलेले समोर का येत नाही हा सुद्धां खुप मोठा गंभीर प्रश्न आहे. आजही अनेक मराठ्यांना आरक्षणासाठी रस्त्यावर उतरणे लाजीरवाणे वाटते परंतु गुपचुप कुणबी प्रमाणपत्र घेऊन ओबिसीचा लाभ घेऊन मोकळे होणाऱ्यांची संख्या सुद्धां जास्त आहे. एकिकडे सरकार म्हणते पुरावे सादर करा तेव्हा ज्या मराठ्यांकडे कुणबीचे प्रमाणपत्र आहे त्यांनी समोर येणे गरजेचे होते. कारण विदर्भाचा जर विचार केला तर बहुसंख्य मराठ्यांकडे कूणबीचे प्रमाणपत्र आहे. आणि ते ओबीसी आरक्षणाचा फायदाही घेतात. काही काही कुटुंबात तर एक भाऊ कुणबी एक भाऊ मराठा आहे विषेश म्हणजे दोघांचा बाप एकच आहे. अशा वेळी असे पुरावे सरकारला सादर केले तर ओबिसी आरक्षणाचा फायदा आपल्याच समाजातील इतर लोकांना होईल व सर्वांना कुणबीचे प्रमाणपत्र मिळेल. परंतु अनेक ओबिसी आरक्षणाणे मराठा लाभार्थी हे समोर आले नाही, आणि ज्यांनी ओबिसी आरक्षणाचा फायदा घेऊन समाजात जागृती केली नाही यामुळे समाज कागदपत्रे तयार करण्यासाठी मागे राहीला आणि आज सरकार त्यांची ओढाताण करत आहे. आता ही मनोज जरांगे यांनी अटींवर उपोषणाला स्थगिती देऊन सरकार ला वेळ दिला. तस पाहिले तर एवढा वेळ सरकारने ही घेणे गरजेचे नव्हते. कारण मुद्दा वैधानिक आहे. तरीही मनोज जरांगे यांनी सरकार ला काम करण्यासाठी आणि लोकांना कोणताही त्रास होऊ नाही म्हणून उपोषणाला स्थगिती देऊन उपोषण मागे घेतले. जरांगे उपोषण करत असताना महाराष्ट्रातील लहानातील लहान मुलांना सुद्धां कळाले की जरांगे सरसकट कुणबी प्रमाणपत्राची मागणी करत आहेत परंतु जसेही जरांगे यांनी उपोषण मागे घेतले तसेच मुख्यमंत्री यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले सरसकट प्रमाणत्राचे बोलणे झालेच नाही. दुसरी गोष्ट म्हणजे मनोज जरांगे म्हणतात सरकार ला २४ डिसेंबर पर्यंत वेळ दिला तर सरकार म्हणते २ जानेवारी पर्यंत वेळ आहे. थोडक्यात काय तर जरांगे यांनी उपोषण जरी मागे घेतले तरीही सरकार लोकांना चुकिची माहिती देऊन भडकवण्याचे काम करत आहे. अजून एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे जसे जरांगे यांनी उपोषण मागे घेतले तेव्हाच उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे अगदीच निकटवर्ती वकील यांनी न्यायालयात मराठा आरक्षणा विरोधात पुन्हा याचीका दाखल केली. याचीका कोणी दाखल केली हे नाव घेताही सर्वांना त्या वकिलाचे नाव माहिती आहे. मग अशा ठिकाणी प्रश्न उपस्थित राहतो की न्यायालयात प्रलंबित असलेल्या खटल्यावर सरकार काम करू शकते का? दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे जर डिसेंबर पर्यंत अपात्र आमदारांचा निकाल लागला आणि आमदार अपात्र झाले तर नवीन सरकार बनेल की राष्ट्रपती राजवट लागेल? आणि समोर निवडणूक येऊन उभी आहे. निवडणूक आचारसंहिता लागु झाल्यावर कुणबी प्रमाणपत्राचा मुद्दा निकाली निघेल का ? हे सर्व आव्हाने समोर असताना जरांगे शांततेने आंदोलन सुरू ठेऊ म्हणतात पण प्रकरण न्यायालयात असताना न्यायालयाचा निकाल येईपर्यंत त्या बाबतीत जरांगे ही काही करू शकणार नाहीत. अशी परिस्थिती समोर असताना मागच्या वेळी न्यायालयाने मागितलेला डाटा सरकारने तयार केला नाही. जर सरकार कडे डाटाच नसेल तर सरकार न्याय देईल तरी कसा? सरकारला न्यायच द्यायचा होता, सरकार जर मराठा समाजाच्या बाजुने सकारात्मक असेल तर गायकवाड समीतीचा अहवाल न्यायालयाने नाकारल्या नंतर सरकारने नवीन काय पाऊले उचलले हे अजूनही गुलदस्त्यातच आहे. केवळ बैठका घेऊन, पत्रकारपरिषदा घेऊन विषय सुटणार नाही. फडणवीस साहेबांचे जवळचे माणसे न्यायालयात याचीका दाखल करतात त्या याचिकेवर सरकार किंवा मराठ्यांची बाजु मांडणारे शासकीय कागदपत्रे आवश्यक आहेत. यासाठी मराठा हि जात नसुन तो प्रांतिक शब्द आहे आणि अनेक मराठ्यांकडे कुणबी प्रमाणपत्र असून ते आरक्षणाचा फायदा घेतात मग बाकीच्या मराठ्यानांही हा फायदा मिळावा म्हणून ज्या मराठ्यांकडे कुणबी प्रमाणपत्र आहे, एकाच घरात एक कुणबी एक मराठा आहे हे कागदपत्रे एकत्रित करून सादर केले तर न्यायची अपेक्षा करू शकतो. नाहीतर आंदोलनाचे लढा सरकार तिढा निर्माण करून कशा पद्धतीने दाबुन टाकतो हे सर्वांना माहिती आहे. एकदा कूणबी प्रमाणपत्र मिळाले तर कुणबी जात ओबीसी मध्ये येते आणि ओबीसी प्रवर्गाला संविधानीक आरक्षण आहेच. येथेच विषय संपतो. फक्त सरकारची चांगले काम करण्याची इच्छा पाहिजे.



बुद्धभूषण चं. कांबळे
संपर्क क्र. 7498715661

## मानवता हाच खरा धर्म...

आधुनिक केसरी

**निसर्गाने जीवसृष्टी निर्माण केली. त्यात मानव प्राणी सूद्धा बनवले. माणसाला बुद्धी दिली, भावना व्यक्त करण्यासाठी भाषा दिली.मात्र हे इतर प्राण्यांना दिले नाही. पुढे माणूस समूहाने एकत्र राहू लागला.आणि त्या त्या प्रदेशानूसार माणसाचे नियम वेगवेगळे झाले आणि मग उदा. मूस्लीम, ख्रिश्चन असे धर्म त्यांच्या सोयीसाठी बनले.सगळेच धर्म चांगलेच आहेत, कोणताच धर्म दुसऱ्या धर्माविषयी चूकीचा विचार सांगत नाही किंवा वाईट बोलत नाही.पण तरीही नेहमी दोन धर्मामध्ये भांडण तंटे होतात. या पार्श्वभूमीवर असा एखादा धर्म नाही का निर्माण होऊ शकत, जिथे माणसे भांडण तंटे करणार नाहीत, लढाया करणार नाहीत, युध्द करणार नाहीत. असा धर्म माझ्यामते मानवता धर्म आहे. सर्व धर्मातल्या संतांनी मानवता धर्माचाच पुरस्कार केला आहे.**

आता मानवता धर्म म्हणजे काय? तर माणुसकीचे वर्तन म्हणजे मानवता धर्म,जे जे मला हवे ते ते दुसऱ्याला देणे म्हणजे माणूसकी धर्म होय.गाडगे बाबांनी भुकेलेल्यांना अन्न दिले. तहानलेल्यांना पाणी पाजले, ग्यांची सेवा केली,धर्मशाळा बांधल्या सावित्रीबाई फुले व महात्मा फुलेंनी मूलींसाठी पहीली शाळा काढली. हे खरे मानवता धर्माचे पाईक आहेत. आपणही आपल्या आयुष्यात दुसऱ्यांच्या सुखासाठी, आनंदासाठी व हितासाठी काही करु शकत असाल तर मग आपणही मानवता धर्माचे पाईक आहात. असेच म्हणावे लागेल. हातातून फेकलेला दगड १०० फुट दूर जातो, बंदुकीतून निघालेली गोळी १००० फुट दूर जाते, परंतु एका गरिबाला दिलेला भाकरीचा तुकडा स्वर्गाच्या दारापर्यंत जातो कोणत्याही धर्मात असा उल्लेख केलेला नाही कि फक्त आपलाच धर्म श्रेष्ठ आहे आणि दुसऱ्यांचा कनिष्ठ आहे. अशी मानसिकता लोकांची झाली आहे.सांगायचा मूद्दा काय तर सर्वात महत्त्वाचा धर्म म्हणजे मानवता धर्म आहे हे आपण समजून घेतले पाहीजे. एकमेकांवर जिवापाड प्रेम करणे, एकमेकांना अर्थिक व सामाजिक मदत करणे, प्रत्येकाविषयी सहानूभूती दाखवणे, जेष्ठांबद्दल मनात आदर बाळगणे, समोरच्याला कधीही तुच्छ न लेखणे, तो गरीब असो की श्रीमंत असो वा कोणत्याही वर्णाचा असो,कूठल्याही जाती धर्मातून आलेला असो, शारीरिक व मानसिक दृष्ट्या सबल असो किंवा दुर्बल असो हे सगळेच आपल्यासाठी समान आहेत.हा विचार पहिल्यांदा मनात रुजवायला हवा.विशेष म्हणजे मनुष्य असो वा कुठलाही प्राणी आपल्या मनात त्याच्याबद्दल दया,आपूलकी व प्रेमभाव असला पाहीजे. कारण हाच खरा मानवता धर्म आहे.माणसाने आदी माणूस बनावे व एक माणूस म्हणून स्वतःची काहीतरी ओळख निर्माण करावी व स्वतःतील गुणदोष




स्वतःच ओळखावेत व दुर्गुण काढून टाकावेत. चांगल्या गुणांचा योग्य ठिकाणी वापर करावा म्हणजे उभ्या आयुष्यात जिंकलेली मने, मिळवलेलं प्रेम, केलेली मदत मेल्यानंतर सुद्धा जिवंतच राहते आणि यालाच आपण मानवता धर्म असे म्हणतो. कोणताही भेदाभेद मनात न ठेवता. प्रत्येक प्राणीमात्रावर प्रेम करणे हाच खरा मानवता धर्म आहे. या धर्मासमोर माणसाने तयार केलेली सर्व धर्म फेल आहेत.हिंदू धर्मात तर एकच आहे परंतु जातीभेद खूप आहेत. एकदा असेच मी एका मुस्लीम व्यक्तीला विचारले कि तुमच्या इस्लाम धर्मामध्ये ही असेच आहे का? तर त्या व्यक्तीने अतिशय छान उत्तर दिले.ते काय ते नीट ऐका तो व्यक्ती बोलला कि मी इस्लाम धर्मात नाही पण मुस्लिमांमध्ये आहे. क्षुल्लक कारणांवरून भांडत बसण्यापेक्षा मी श्रेष्ठ कि तू श्रेष्ठ असा वाद घालत बसण्यापेक्षा प्रत्येक मनुष्याने स्वतःला एक प्रश्न विचारायला हवा.की मी माणूस म्हणून जन्माला आल्यापासून इतरांसाठी काय केल आहे? मग ते कोणीही असो,आपले असो की परके असो,कुठल्याही व्यक्तीसाठी मी माणूस म्हणून काय केले आहे.भिकाऱ्यांना भिक आणि दानपेटीत दान केल्याशिवाय इतर काही आठवते का आपल्याला ? मग ते काम छोट्यात छोटे असो कि मोठ्यात मोठे असो,तर उत्तर काय मिळेल.बोटावर मोजण्या इतक्या व्यक्ती सोडल्या तर बऱ्याच लोकांकडे या प्रश्नाचे उत्तर देखील नसेल.शेवटी एकच सांगावेसे वाटते कि, मनुष्य प्राणी चंद्रावर गेला आहे.मंगळावर पोहोचला आहे .एवढेच नव्हे तर वेगवेगळ्या सौरमालेत सजीवाला राहाण्याजोगे नवीन एखादे घर म्हणजेच एखादा ग्रह आहे का ? हे मानव शोधत आहे.परंतु त्याच माणसाला आपल्या शेजारी कुणाचे घर आहे हे देखील माहित नसते.मग त्या माणसाला आपण काय म्हणावे.तो प्रगती करतोय की कळत न कळत मानव धर्माची अधोगती करतोय....

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739



# मनोज जरांगे पाटील यांच्या अंदोलनाला लोणार तालुका वकील संघाचा पाठिंबा

आधुनिक केसरी न्यूज

**लोणार :** 28 ऑक्टोबरपासून मनोज जरांगे पाटील हे मराठा समाजाला सरसगट कुणबी जातीचे प्रमाणपत्र मिळावे व समाजाला आरक्षण मिळण्यासाठी संविधात्रीक मार्गाने उपोषण केले त्यांच्या या अंदोलनास जगभरातील कोट्यवधी लोकांनी पाठिंबा दिला असून त्याची मागणी ही कायदेशीर व रास्त असल्याने लोणार तालुका वकिलसंघाने सुध्दा त्यांच्या अदोलनास जाहीर पाठींबा देत आहे. व त्यासाठी लोणार तालुका वकिल संघाच्या सदस्यांनी दि. 31/10/2023 रोजी न्यायालयीन कामकाजापासुन अलीप्त राहुन अंदोलणास सहभाग दर्शविला. सदर अंदोलण हे लोणार तालुका वकिल संघाचे अध्यक्ष ॲड. दिपक मापारी यांचे अध्यक्षतेखाली व ज्येष्ठ विधीज्ञ ॲड. एस. पी. हाडे यांच्या मार्गदर्शनात झाले असून या अदोलणात वकिल संघाचे सचिव ॲड सुधाकर अवचार व सहसचिव ॲड. अवसरमोल, कोषाध्यक्ष ॲड. फौजीया अली तसेच वकिल संघाचे सदस्य ॲड. शिवाजी सानप, ॲड. सदाशिव मुंढे, ॲड अशोक लहाने, ॲड विठठल तनपुरे, ॲड. रंणजित डव्हळे, ॲड. सुजित मोरे, ॲड. प्रफुल्ल जायभाये, ॲड. शिवम पालवे, ॲड. भिमराव अंभोरे, ॲड. विष्णु वाघ, ॲड. ऋषीकेश डहाळके, ॲड. अशिष मोरे, ॲड. तिनगुरीया या सर्व सदस्यांनी न्यायालयीन कामकाजापासुन अलीप्त राहुन मनोज जरांगे पाटील यांच्या अंदोलनास पाठींबा दर्शविला व सरकारने त्याची मागणी पुर्ण करण्याबाबत निवेदन दिले.

# एक शेतकऱ्याने शेतशीव रस्ता बंद केला तर ग्रामस्थांनी गावचे शिव रस्तेच केले बंद

आधुनिक केसरी न्यूज

**इगतपुरी :** तालुक्यातील मौजे कांचनगाव येथील गट नं.९१ मध्ये बंद केलेला रस्ता खुला करण्याचा आदेश प्रशासनाकडून दिला गेला असताना आज पुन्हा शेतकऱ्याने शासनाच्या आदेशाची पायामली करत तोच रस्ता पुन्हा बंद केला आहे.  कांचनगाव ता इगतपुरी, जि. नाशिक  येथील भाऊसाहेब शंकर गव्हाणे यांचे मालकीचा गट नं. ९१ मध्ये बंद केलेला रस्ता खुला करुन मिळण्याबाबत तहसीलदार यांना अर्ज केला होता मात्र अद्याप पर्यंत सबंधित शेतकरी भाऊसाहेब शंकर गव्हाणे यांनी गट नं. ९१ मध्ये बंद केलेला रस्ता खुला करुन दिलेला नाही. त्यामुळे आज सर्व कांचनगाव ग्रामस्थांनी सबंधित शेतकऱ्याचा निषेध म्हणून गावातील तब्बल सात ते आठ शिव रस्ते बंद केले आहे. जोपर्यंत स्थानिक प्रशासन पुन्हा गावात भेट देत नाही तोपर्यंत पूर्ण रस्ते बंद राहतील असा कडक इशारा यावेळी ग्रामस्थांनी दिला आहे. एन भात सोंगणी च्या टप्यात असताना शेतकऱ्यांना जाण्यास अडचण होत आहे मात्र स्थानिक शेतकऱ्याच्या आडमुठ्यपणाने रस्ता बंद केला आहे. त्यामुळेच सर्व ग्रामस्थांनी एकी करत गाव व शिव रस्ते बंद केले आहे दरम्यान यावेळी ग्रामस्थांनी सांगितले की स्थानिक प्रशासन याची दखल घेत नाही तोपर्यंत रस्ते खुले होणार नाही. यावर इगतपुरी तहसीलदार स्थानिक गावकरी काय पर्याय काढतात हे महत्वाचे आहे.



# जामदरीत तुकडोजी महाराजांची पुण्यतिथी

आधुनिक केसरी न्यूज

**भोकर :** ग्रामगीतेच्या माध्यमातून गाव विकासाची संकल्पना मांडणारे खंजिरी भजनातून जनजागृती करणारे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांची ५६वी पुण्यतिथी गुरूवारी ता. (दोन) जामदरी टेकडी येथे साजरी करण्यात आली.

सदरील कार्यक्रमास नांदेड गुरूव्दाराचे बाबा बलविंदरसिंह, जिल्हाधिकारी अभिजित राऊत, जिल्हा कृषी अधीक्षक भाऊसाहेब बरोटे, बाबुराव भांगे, गोविंद माऊली यांची उपस्थिती होती.राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या समाधीचे पूजन करून त्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली व सर्वधर्मीय प्रार्थना घेण्यात आली. गुरुदेव वनराई बंधारा पूजन, पंजाबराव देशमुख जैविक शेती मिशन व सेंद्रिय शेती विषयक मार्गदर्शन, सार्वभौम ग्रामसभे बाबत चर्चासत्र, ग्रामगीता प्रवचन, असे विविध कार्यक्रम घेण्यात आले. गुरुदेव सेवा मंडळ सावरगाव तालुका अर्धापूर यांचा भजनी मंडळाचा कार्यक्रम झाला. राष्ट्रवंदनेने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. तालुक्यातील सरपंच मंडळी, कृषी अधिकारी, कृषी सहाय्यक यांच्यासह गुरुदेव प्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# वीज कंत्राटी कामगारांनी काढला मंत्रालयावर मोर्चा

आधुनिक केसरी न्यूज

**उरण :** ऊर्जामंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शासनातील कंत्राटी भरती पद्धत रद्द केली आता त्यांच्याच ऊर्जा खात्यातील महावितरण, महापारेषण, महानिर्मिती, कंपनीतील नियमित मंजूर रिक्त पदाच्या जागेवर मागील २० ते २५ वर्षे फक्त प्रति माहे  १५०००/रू  अल्पवेतनात काम करत असलेल्या सर्व वीज कंत्राटी कामगारांची कंत्राटी पद्धत बंद करून रोजंदारी कामगार पध्दती द्वारे कंत्राटदार विरहित व शाश्वत रोजगार देण्या बाबत धोरणात्मक निर्णय घेऊन न्याय द्यावा या मागणी साठी भारतीय मजदूर संघाच्या महाराष्ट्र वीज कंत्राटी कामगार संघाच्या वतीने १ नोव्हेंबर २०२३ रोजी मंत्रालय येथे मोर्चा नेण्यात आला. संघटनेने दिलेल्या नोटीस नुसार तिन्ही वीज कंपनीचे मुख्य कार्यालय, जिल्हाधिकारी, लेबर ऑफिस, व राज्यातील आमदार , खासदार, लोकप्रतिनिधींना निवेदन देण्यात आले होते. हा विषय शासकीय पातळीवर नेऊन चर्चा करून न्यायाची अपेक्षा होती पण शासनाने उदासीनता दाखवल्यामुळे नाईलाजास्तव संघटनेने मंत्रालयाच्या गार्डन गेट समोर मोर्चा नेऊन लक्षवेधी आंदोलन केले.



# पहूरला लोहपुरुष सरदार पटेल जयंती

आधुनिक केसरी न्यूज

**जामनेर :** तालुक्यातील पहूर येथे महात्मा फुले शिक्षण संस्था संचालित  सावित्रीबाई फुले माध्यमिक विद्यालयात लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांची जयंती व स्वर्गीय पंतप्रधान इंदिरा गांधी यांची पुण्यतिथी साजरी करण्यात आली. प्रारंभी शाळेच्या मुख्याध्यापिका व्ही. व्ही. घोंगडे यांनी पुष्पहार अर्पण करून प्रतिमांचे पूजन केले. यावेळी  शंकर भामेरे यांनी इंदिरा गांधी आणि लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या कार्याबद्दल मार्गदर्शन केले. उपमुख्यध्यापिका के. ए. बनकर, ज्येष्ठ शिक्षीका एम. एच. बारी यांच्या सह सर्व शिक्षक  शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.


Contoura Vision
चष्मा नको ?
चष्मा घालवा कायमचा.
डॉ.कांकरिया यांचे
साई सूर्य नेत्रसेवा,अहमदनगर तर्फे
लेसर नेत्र शस्त्रक्रिया शिबीर
'कॉन्टूरा व्हिजन' जगातील सर्वात प्रगत तंत्रज्ञान
मोतीबिंदू ,काचबिंदू , तिरळेपणावर उपचार
दि.१९ नोव्हें.२३, हॉटेल रविराज,बाबा पेट्रोल पंपाजवळ, छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद)-(सकाळी १० ते १२),
दि.२५ नोव्हे.२३, हॉटेल अन्विता, बीड (सकाळी १० ते १२),
दि.२५ नोव्हे.२३, हॉटेल पार्थ, लातूर (दुपारी ४ ते ६).
विशेष सवलतीच्या दरात शस्त्रक्रिया केल्या जातील. नोंदणी फिस रु.१००
9112288611
8888982222

महाराष्ट्र Business Katta

तिरुपती मंडप डेकोरेटर्स
Generator, Lighting, Mandap, Open Mandap, DJ Sound, Stage, Chairs & Garden Decorate
Baiju Anna 8623904312
Abhijeet Shukla 9765826252
DARZI BAZAR, CANTONMENT, CHHATRAPATI SAMBHAJINAGAR

अर्जंट पाहिजेत
बॅंक ऑफिससाठी महिला (कॉम्प्युटरचे ज्ञान आवश्यक), अनुभवी सुपरवायजर, मार्केटिंग प्रतिनीधी (स्वत:ची टू-व्हीलर आवश्यक) आणि अनुभवी सेक्युरिटी गार्ड पाहिजे.
संपर्क - 9822982958

CAFÉ ROCKSTARZ EAT. CHILL. REPEAT
11:11 ELEVEN ELEVEN
Where Dishes come True..!!
MULTI-CUISINE FAMILY RESTRO
AURANGABAD
Indian, Continental, Italian, Chinese, Chat, Pavbhaji, Shakes, Desserts
9665544629
GHAI TOWER, BESIDE RAJ CLOTH, CANNAUGHT GARDEN, CHHATRAPATI SAMBHAJINAGAR

खळबळजनक
कॉम्प्युटर, लॅपटॉप, प्रिंटर, सीसीटीव्ही
Sales & Services
नवीन कॉम्प्युटर 9900/-
जुने कॉम्प्युटर 5900/-
जुने लॅपटॉप 6900/-
दोन कॅमेरा सेटअप 7900/-
चार कॅमेरा सेटअप 9900/-
9420405928

# मागास जातीतील महिला शास्त्रज्ञ!



श्रीकृष्णदास निरंकारी (बापू)
संपर्क क्र. 9423714883

आधुनिक केसरी


**अम्मल यांनी सन १९३५ साली भारतीय विज्ञान अकादमीच्या फेलो आणि सन १९५७ मध्ये इंडियन नॅशनल सायन्स अकादमीचे सदस्य म्हणून काम केले. मिशिगन विद्यापीठाने त्यांना मानद एल्एलडी दिली. सन १९५६मध्ये भारत सरकारने त्यांना पद्मश्री पुरस्कार दिला. भारत सरकारच्या पर्यावरण आणि वनीकरण मंत्रालयाने सन २०००मध्ये त्यांच्या नावावर वर्गीकरण राष्ट्रीय पुरस्कार सुरू केला. त्यांनी इंग्लंडमध्ये घालवलेल्या अनेक वर्षांमध्ये जानकीने बागांच्या विस्तृत वनस्पतींचे गुणसूत्र अभ्यास केले.**

गुणसूत्र संख्या आणि चाली यांच्यावरील त्यांच्या अभ्यासाने अनेक प्रकरणांमध्ये प्रजाती आणि वाणांच्या उत्क्रांतीवर प्रकाश टाकला. सन १९९५मध्ये सीडी डार्लिंग्टन यांच्यासमवेत त्यांनी संयुक्तपणे लिहिलेल्या क्रोमोजोम अटलस ऑफ कल्टिवेटेड प्लांट्स हे एक संकलन होते ज्यामध्ये त्यांच्या स्वतःच्या बऱ्याच लेखांचा समावेश होता. सोसायटीमध्ये त्यांनी ज्या वनस्पतींवर काम केले त्यापैकी एक म्हणजे मॅग्नोलिया होय. आजपर्यंत विस्ली येथील सोसायटीच्या आवारात त्यांनी लागवड केलेले मॅग्नोलिया झुडपे आहेत आणि त्यापैकी एकास लहान प्रकारची पांढरी फुले आहेत, ज्याचे नाव आहे- मॅग्नोलिया कोबस जानकी अम्माल. हे जपानी आणि चीनी दंतकथांमध्ये वर्णित केलेले एक फूल आहे. या जातीपासून फुललेले फ्युज सिप्पल आणि पाकळ्या बनवतात ज्याला टेपल्स म्हणतात. आज युरोपमध्ये केवळ काही रोपवाटिकांमध्ये विविध प्रकारची शेती आहे.

एदावलेत कक्कट जानकी अम्मल या सायटोजेनेटिक्स आणि फायटोगॉजीमध्ये वैज्ञानिक संशोधन केलेल्या भारतीय वनस्पतिशास्त्रज्ञ होत्या. केरळातील सदाहरित वनांमधून त्यांनी औषधी गुणधर्म असलेल्या व आर्थिकदृष्ट्या मौल्यवान समजल्या जाणाऱ्या झाडाझुडपांच्या नमुन्यांचा संग्रह केला. त्या भारतीय विज्ञान अकादमीच्या एक संस्थापक होत्या. सन १९५७ मध्ये इंडियन नॅशनल सायन्स अकादमीचे सदस्य म्हणून काम केले. मिशिगन विद्यापीठाने त्यांना मानद एल्एलडी दिली. सन १९५६मध्ये भारत सरकारने त्यांना पद्मश्री पुरस्कार दिला. भारत सरकारच्या पर्यावरण आणि वनीकरण मंत्रालयाने सन २०००मध्ये त्यांच्या नावावर वर्गीकरण राष्ट्रीय पुरस्कार सुरू केला.


जानकी अम्मल यांचा जन्म दि.४ नोव्हेंबर १८९७मध्ये केरळमधील तेलिचेरी येथे झाला. त्याचे वडील दिवाण बहादूर एदावलेत कक्कट कृष्णन हे मद्रास प्रेसिडेन्सीचे उपन्यायाधीश होते. त्यांची आई देवी ही जॉन चाईल्ड हॅनिंगटन आणि कंची कुरुंबी यांच्या नात्यातील एक मुलगी होती. जानकी अम्मल यांना सहा भाऊ आणि पाच बहिणी होत्या. त्यांच्या कुटुंबातील, मुलींना बौद्धिक उद्योग आणि ललित कलांसाठी प्रोत्साहन दिले जात असे, परंतु अम्मल यांनी वनस्पतिशास्त्राचा अभ्यास करण्याचा निर्णय घेतला. तेलिचेरीमध्ये शालेय शिक्षण पूर्ण केल्यावर त्या मद्रासला दाखल झाल्या. तेथे त्यांनी क्वीन मेरियर्स महाविद्यालयामधून पदविका आणि पुढे प्रेसिडेन्सी महाविद्यालयातून इ.स.१९२०मध्ये वनस्पतिशास्त्राची पदवी प्राप्त केली. नंतर प्रेसिडेन्सी महाविद्यालयातील प्राध्यापकांच्या प्रेरणेने अम्मल यांनी सायटोजेनेटिक्स विषयात पदवी प्राप्त केली.

मद्रास येथे महिला ख्रिश्चन महाविद्यालयात शिकत असताना सन १९२५मध्ये त्यांनी पदव्युत्तर पदवी मिळविली. भारतात परतल्यावर त्यांनी महिला ख्रिश्चन कॉलेजमध्ये शिक्षण सुरू ठेवले. त्या प्रथम ओरिएंटल बारबोर फेलो म्हणून मिशिगनला गेल्या. तेथेही त्यांनी अमेरिकेतील सर्वोत्कृष्ट सार्वजनिक विद्यापीठांपैकी एक असलेल्या विद्यपीठामध्ये पीएच.डी. मिळवली. दि.१ जानेवारी १९९२ रोजी एस.गोपीकृष्ण आणि वंदना कुमार यांनी प्रकाशित केलेल्या इंडिया करंट्स या नियत कालिकात त्यांचा एक लेख प्रसिद्ध झाला होता. मिशिगन विद्यापीठाकडून डीएससी ही पदवी मिळवणाऱ्या काही आशियाई महिलांपैकी त्या एक आहेत. ॲन आर्बर यांनी जानकी ब्रेनल म्हणून ओळखले जाणारे एक क्रॉस- ब्रीड विकसित केले. त्यांचा क्रोमोझोम स्टडीज इन निकँड्रा फिजॉलाइड्स हा लेख इ.स.१९३२मध्ये प्रकाशित झाला. इ.स.१९२५ बार्जुर शिष्यवृत्ती मिळवून मिशिगन अमेरिकेची संयुक्त संस्थाने येथून एमएससी पदवी घेऊन भारतात परत आल्या. इ.स.१९३१ पुन्हा मिशिगनला उच्चशिक्षण व तेथून डॉक्टर ऑफ सायन्स ही उच्च पदवी घेऊन भारतात परतल्या. लंडनच्या जॉन इन्स हॉर्टिकल्चरल इन्स्टिट्युटमध्ये वनस्पती-पेशी संशोधन उपशास्त्रज्ञ म्हणून काम केले. इ.स.१९४५पासून



१९५१पर्यंत वेल्स येथील रॉयल हॉर्टिकल्चरल सोसायटीत वनस्पतीपेशी शास्त्रज्ञ म्हणून काम केले. क्रोमोसोम ॲटलास ऑफ गार्डन प्लांट्स हा प्रबंध सी.डी.जर्लिंग्टन यांच्या साह्याने प्रसिद्ध केला. सायटोजेनेटिक्समधील तज्ञ म्हणून जानकी कोयंबटूर येथील ऊस प्रजनन केंद्रात ऊस जीवशास्त्रात काम करण्यासाठी दाखल झाल्या. त्यावेळी जगातील सर्वात गोड ऊस पापुआ न्यू गिनी येथील सॅचरम ऑफिसियानारम प्रकार होता आणि भारत आग्नेय आशियातून आयात करतो. सन १९२०च्या दशकाच्या सुरुवातीच्या काळात कोयंबटूर येथे ऊस प्रजनन केंद्र सुरू करण्यात आले. प्रयोगशाळेत संकरित क्रॉस ब्रीडिंगद्वारे पॉलीप्लॉईड पेशी हाताळल्याने त्या भारतीय परिस्थितीत उसाला ऊस देण्याचे उच्च उत्पादन घेण्यास सक्षम होत्या. त्यांच्या संशोधनातून संपूर्ण भारतभर उसाच्या भौगोलिक वितरणाचे विश्लेषण करण्यास आणि साखरेम स्पॉन्टेनियमच्या उसाची उत्पत्ती भारतात झाली, हे सिद्ध करण्यास मदत केली. तथापि मागास मानल्या गेलेल्या जातीतील एकट्या महिला म्हणून त्यांचा दर्जा कोयंबटूर येथील जानकरांना अडचणीत आणणारा प्रश्न निर्माण झाला. जात आणि लिंग आधारित भेदाचा सामना करणे, त्यांच्या या कार्यामुळे प्रभावित होऊन रॉयल हॉर्टिकल्चर सोसायटीने त्यांना जगभरातील वनस्पतींच्या संग्रहासाठी प्रसिद्ध असलेल्या के गार्डन जवळील विस्ली येथे त्यांच्या कॅम्पसमध्ये सहाय्यक सायटोलॉजिस्ट म्हणून काम करण्यास आमंत्रित केले होते. त्यांनी इंग्लंडमध्ये घालवलेल्या अनेक वर्षांमध्ये जानकीने बागांच्या विस्तृत वनस्पतींचे गुणसूत्र अभ्यास केले. गुणसूत्र संख्या आणि चाली यांच्यावरील त्यांच्या अभ्यासाने अनेक प्रकरणांमध्ये प्रजाती आणि वाणांच्या उत्क्रांतीवर प्रकाश टाकला. सन १९९५मध्ये सीडी डार्लिंग्टन यांच्यासमवेत त्यांनी संयुक्तपणे लिहिलेल्या क्रोमोजोम अटलस ऑफ कल्टिवेटेड प्लांट्स हे एक संकलन होते ज्यामध्ये त्यांच्या स्वतःच्या बऱ्याच लेखांचा समावेश होता. सोसायटीमध्ये त्यांनी ज्या वनस्पतींवर काम केले त्यापैकी एक म्हणजे मॅग्नोलिया होय. आजपर्यंत विस्ली येथील सोसायटीच्या आवारात त्यांनी लागवड केलेले मॅग्नोलिया झुडपे आहेत आणि त्यापैकी एकास लहान प्रकारची पांढरी फुले आहेत, ज्याचे नाव आहे- मॅग्नोलिया कोबस जानकी अम्माल. जपानी आणि चीनी दंतकथांमध्ये वर्णित केलेले एक फूल आहे. या जातीपासून फुललेले फ्युज सिप्पल आणि पाकळ्या बनवतात ज्याला टेपल्स म्हणतात. आज युरोपमध्ये केवळ काही रोपवाटिकांमध्ये विविध प्रकारची शेती आहे. त्यांचे दुःखद निधन दि.७ फेब्रुवारी १९८४ रोजी झाले.

# भारतीय संघाचा दबदबा



श्याम बसप्पा ठाणेदार
संपर्क क्र. : ९९२२५४६२९५

आधुनिक केसरी

**भारतात सुरू असलेली एकदवसीय विश्वचषक स्पर्धा अर्ध्यावर आला आली आहे. प्रत्येक संघाचे साधारणपणे सहा ते सात सामने संपले असून दोन किंवा तीन सामने उरले आहेत. विश्वचषक स्पर्धेच्या या पहिल्या टप्प्यात अनेक धक्कादायक निकाल लागले आहे. अनेक दिग्गज संघांना पराभवाचे झटके मिळाले असून अफगाणिस्तान, नेदरलँड यासारख्या नवख्या संघाने अनपेक्षितपणे उसळी मारून क्रिकेट विश्वाला चकित केले आहे. सर्वात मोठा धक्का बसला तो गतविजेता इंग्लंड संघाला.**

इंग्लंड संघ हा गतविजेता असून यावेळीही तो विजेतेपदासाठी सर्वांचा फेवरेट संघ होता. अनेक दिग्गज माजी खेळाडूंचा हा पहिल्या पसंतीचा संघ होता. स्पर्धेतील सर्वात बळकट संघ असूनही या संघाची कामगिरी अतिशय सुमार झाली. सहा सामन्यात केवळ एक विजय या संघाला मिळवता आला. अफगाणिस्तान, नेदरलँड यासारख्या नवख्या संघाकडून पराभव स्वीकारावा लागल्याने हा संघ तळाशी गेला आहे. तीच अवस्था बांगलादेश आणि श्रीलंका या देशांची झाली आहे. या संघानेही लौकिकास साजेशी कामगिरी केली नाही. पाकिस्तान हा या स्पर्धतील सर्वात धोकादायक संघ समजला जात होता. या संघाचाही अनेकांनी संभाव्य विजेत्यांच्या यादीत समावेश केला होता मात्र त्यांनाही विशेष कामगिरी करता आली नाही. उपांत्य फेरीत पोहचण्याची या संघाची शक्यता धूसर असून हा संघ ही उपांत्य फेरीच्या स्पर्धेतून जवळपास बाद झाला आहे. ऑस्ट्रेलियाने डळमळीत सुरवात केली मात्र आता हा संघ रुळावर आला असून उपांत्य फेरी गाठण्यासाठी हा संघ प्रयत्नशील आहे. न्यूझीलंडनेही चांगली सुरुवात केली भारत आणि दक्षिण आफ्रिकेविरुद्ध पराभव स्वीकारावा लागल्याने हा संघ थोडा मागे फेकला गेला असला तरी उपांत्यफेरीत हा संघ पोहचू शकतो. दक्षिण आफ्रिका या स्पर्धेत अप्रतिम कामगिरी करत आहे त्यांनी केवळ एकच सामना गमावला आहे त्यामुळे त्यांची उपांत्यफेरी निश्चित आहे. त्यांचे फलंदाज चांगल्याच फॉर्मात आहे . प्रत्येक सामन्यात त्यांच्या फलंदाजांनी खोऱ्याने धावा काढल्या आहेत. त्यांचे गोलंदाज ही चांगली कामगिरी करत आहेत. उपांत्य फेरीत जर या संघाने माती खाल्ली नाही तर हा संघ अंतिम फेरीत पोहचू शकतो. या स्पर्धेतील सर्वात जबरदस्त कामगिरी केली ती यजमान भारताने. भारत या स्पर्धेत स्वप्नवत कामगिरी करत आहे.



भारताने खेळलेल्या सातच्या सात सामन्यात विजय मिळवत गुण तालीक्यात अव्वल स्थानी पोहचला आहे. विशेष म्हणजे सर्व सामने भारताने एकहाती जिंकले आहेत. भारताने या स्पर्धेत आपला दबदबा निर्माण करून प्रतिस्पर्धी संघाला उधवस्थ केले आहे. भारतीय संघ फलंदाजी, गोलंदाजी आणि क्षेत्ररक्षण या तिन्ही आघाड्यांवर अप्रतिम कामगिरी करत आहे. भारताचे सर्वच फलंदाज फॉर्मात असून सर्वच फलंदाज धावा काढत आहेत. भारताच्या गोलंदाजांची तर अक्षरशः दहशत निर्माण झाली आहे. बुमरा, सिराज, शामी, जडेजा, कुलदीप यादव हे भारताचे गोलंदाज प्रतिस्पर्धी संघाला खिंडार पाडत आहेत. भारताच्या गोलंदाजांनी आजवरची सर्वोत्तम कामगिरी या स्पर्धेत केली आहे. या स्पर्धेत भारत जी अप्रतिम कामगिरी करत आहे ती भारतीय गोलंदाजांमुळेच कारण फलंदाज सामना जिंकून देतात तर गोलंदाज स्पर्धा जिंकून देतात. भारत ही विश्वचषक स्पर्धा सहज जिंकू शकतो कारण भारताचे गोलंदाज भन्नाट गोलंदाजी करत आहे. गोलंदाजांचा हा फॉर्म असाच कायम राहिला आणि फलंदाजांनी लौकिकाला साजेशी फलंदाजी केली तर भारत बारा वर्षानंतर पुन्हा विश्वविजय मिळवू शकतो यात शंका नाही.

# ऋची निर्माण झाल्याशिवाय परिवर्तनाचा आरंभ होत नाही

आधुनिक केसरी



गणेश खाडे
संपर्क क्र. 9011634301

जबरदस्तीने परिवर्तन होतं नाही. आवड हिच जीवनातील कोणत्याही प्रकारच्या आरंभाची जननी असते.एकदा आवड निर्माण झाली कि आपली दिशा आणि गती कोणीही बदलु शकत नाही म्हणून जीवन हितार्थ आवड निर्माण झाली पाहिजे पण आवड कशाची निर्माण झाली या नुसार परिणाम येत असतात.आपली मुलं शिकली पाहिजेत घडली पाहिजेत हि प्रत्येक पालकाची भुमिका असते . त्यासाठी पालकांचे प्रयत्न देखील चालू असतात पण सगळ्यात महत्वपूर्ण बाब हिच आहे कि जोपर्यंत कोणत्याही विषयाच्या संदर्भात ऋची निर्माण होत नाही तोपर्यंत परिवर्तन आरंभ होत नाही.ऋची म्हणजे आवड गोडी आणि गोडी जेव्हा मनातुन निर्माण होते तेव्हा आपोआप गती वाढते.ऋची नसेल तर सगळे बाह्य प्रयत्न व्यर्थ ठरतात पण ऋची निर्माण झाली तर मग मात्र जगातील कोणतीही शक्ति आपली गती रोखु शकतं नाही.ज्याला घडयच आहे अथवा ज्याला घडवायचं आहे त्याच्या मनात आपल्या धेय्य विषयी ऋची निर्माण होणं खुप गरजेचं असतं. त्याच्या मनात ऋची निर्माण झाली नाही तर बाह्य प्रयत्न निष्फळ ठरतात.ज्या बाबी विषयी आपल्या मनात ऋची निर्माण होईल त्या बाबी मिळविण्यासाठी आपणं प्रयत्नांची पराकाष्ठा करतो हे वास्तव आहे.प्रयत्नांची गती हि आपल्याला त्या विषया बाबत असणाऱ्या ऋची वर अवलंबून असते.ऋची जितकी जास्त तितकीच प्रयत्नांची गती अधिक असते.जीवनात परिवर्तन घडण्यासाठी आपणं अनेक प्रयोग करत असतो पण वास्तविक सत्य हेच आहे हे कि सगळे प्रयोग करत असताना आपणं आपल्या धेय्याच्या अनुषंगाने आपल्या मनात निर्माण होणारी ऋची हिच निर्णायक ठरते .ऋची असेल तर प्रयत्न आपोआप यशस्वी होण्यासाठी गती वाढते आणि ऋची नसेल तर मग मात्र इतरांनी आपल्याला घडविण्यासाठी केलेले सर्व प्रयत्न निष्फळ ठरतात आपली ऋची आपली गती वाढवत असते.

जिथं ऋची तिथं मन जिथं मन तिथे तन म्हणून जीवनात कोणत्याही प्रकारच कार्य करण्या अगोदर त्या कार्या विषयी मनात ऋची निर्माण झाली पाहिजे.जिथं मन आकर्षित होत तिथे समर्पित भावनेने कार्य आपोआप आरंभ होत .मन आकर्षित झाल्याशिवाय आपण समर्पित भावनेने कार्य करत नाहीत आणि समर्पित भावना निर्माण होण्यासाठी मन आकर्षित झालंच पाहिजे.लादलेली बाब फार काळ प्रभाव निर्माण करत नाही.जीवनातील परिवर्तन हे लादुन घडत नाही त्यासाठी मनात ऋची स्वारस्य निर्माण झाली पाहिजे एकदा का गोडी निर्माण झाली कि मग आपोआपच गती निर्माण होते .बळच बळजबारीने जगात काही घडत नाही .ऋची निर्माण झाल्याशिवाय परिवर्तन घडत नाही. जीवन हिताकरक बाबी मध्ये ऋची निर्माण होत नाही हे अगदी खरं वास्तव आहे जिथे नको तिथे प्रचंड ऋची असते .आपण आपला अनमोल वेळ त्याच ठिकाणी समर्पित करतो ज्या बाबत आपण मनापासून समरस झालेले असतोत .समरस होण्याची स्थिती निर्माण झाली तर मग अशक्य काहीच नसतं पण जो पर्यंत ऋची निर्माण होत नाही तोपर्यंत मनापासून कार्य करण्याची इच्छा निर्माण होत नाही.हित सांगावं लागतं अहित न सांगता घडत असत.वाईट बाबींकडे मन लवकर आकर्षित होत हे अगदी वास्तव आहे.मनाला जो विषय विचार आवडला अथवा मन तिकडे आकर्षित झाल तर आपण कोणत्याही परिस्थितीत कोणत्याही प्रकारच्या परिणामांची पर्वा न करता स्वतःला झोकून देऊन कामाला लागतो . परिणामांची आपण तमा बाळगत नाही.त्यामुळे जीवनात कोणत्याही प्रकारच कार्य तडीस नेण्यासाठी ऋची हि खूप महत्वपूर्ण आहे. बाब चांगली असो की वाईट जिथं ऋची निर्माण झाली तिथं आपणं कोणाचही ऐकत नाही. त्यामुळे ऋची हि महत्वाची ठरत असते आपल्या जीवनात परिवर्तन घडवून आणायचं असेल तर आपल्याला लाभकारी जो विषय बाब आहे त्या विषयी ऋची निर्माण करता आली पाहिजे. पण मुळात आपण याठिकाणी चुकतो कि ऋची निर्माण करण्या ऐवजी वरकरणी प्रयत्न करतो आणि वरकरणी प्रयत्न शेवटी निष्फळ ठरतात. जीवन हितार्थ ऋची हिच निर्णायक ठरत असते .आणि ऋची निर्माण होण्यासाठी स्वयंस्फुर्तीने प्रयत्न केला पाहिजे. जीवनात योग्य ऋची निर्माण होण्यासाठी अध्यात्मिक ज्ञान हाच प्रभावी मार्ग असुन हा मार्ग स्वीकारला तर आपोआपच जीवनात योग्य आणि सात्विक ऋची निर्माण होते.

# तुझं गावच नाही का तीर्थ ?



पंकज वसंत पाटील
मो. 9850439579


आधुनिक केसरी

**आपल्या भजनांचा आणि कीर्तनांच्या माध्यमातून मानव जीवनात 'सत्यम शिवम् सुंदरम्' ही जीवनमुल्ये रुजविणारे महान राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी समाजाच्या सर्व स्तरात एकात्मता प्रस्थापित करण्याचा आजीवन प्रयत्न केला. आत्मसंयमनाचे विचार त्यांनी आपल्या ग्रामचळवळीच्या मार्गदर्शक ग्रामगीता या काव्यातून मांडले. तुकडोजी महाराजांनी मराठी व हिंदी भाषांमध्ये काव्यरचना केली आहे. पारतंत्र्यात जन्मलेले तुकडोजी महाराज इंग्रजी राजवट आणि त्यानंतरच्या स्वातंत्र्याचे केवळ साक्षीदारच नाही तर क्रियाशील प्रवक्ते होते. जनतेला सरंजामशाही व मध्ययुगीन मनोवृत्तीतून पासून बाहेर काढण्याची गरज ओळखून महाराजांनी हाती खंजिरी घेऊन हजारोंचा जनसमुदाय आपल्या वैखरीने मुग्ध केला.**

**(मागील अंकावरून)**

**मनी नाही भाव, म्हणे देवा मला पाव ।**
**देवा अशानं भेटायचा नाही रे ।।**
**देव बाजारचा भाजीपाला नाही रे ।।**

अशा आशयघन रचनेतून देवाचे देवत्व ठाई ठाई आहे तरी मी-पण गेल्यावाचून अनादी-अनंत, शाश्वत-भागवंत भेटणे शक्य नाही. सामान्य लोकांना अतिशय सोप्या शब्दात देव आणि देवत्व याबद्दल सांगतांना भगवंत भक्तीचा भुकेला आहे, आपण माणसात देव पाहायला शिकावे हे समजावून सांगतात. सर्वधर्मसमभाव हेही या राष्ट्रसंताच्या विचारविश्वाचे एक वैशिष्ट्य होते. त्यासाठी तुकडोजी महाराजांनी आग्रहपूर्वक सामुदायिक-सर्वधर्मीय प्रार्थनेचा पुरस्कार केला. तुकडोजी महाराज हे विवेकनिष्ठ जीवनदृष्टीतून एकेश्वरवादाचा पुरस्कार करत असत. धर्मातील अनावश्यक कर्मकांडाला त्यांनी फाटा दिला होता. आयुष्याच्या शेवटापर्यंत त्यांनी आपल्या प्रभावी खंजिरी भजनाच्या माध्यमातून त्यांना अभिप्रेत असलेल्या विचारसरणीचा प्रचार करून आध्यात्मिक, सामाजिक, राष्ट्रीय प्रबोधन केले. अखिल भारतीय पातळीवर त्यांनी साधुसंघटनेची स्थापना केली. गुरुकुंज आश्रमाच्या शाखोपशाखा स्थापन करून त्यांनी शिस्तबद्ध सामाजिक कार्यकर्त्यांची एक फळीच निर्माण केली. गुरुकुंजाशी संबंधित असलेले हे सर्व निष्ठावंत कार्यकर्ते आजही त्यांचे हे कार्य अखंडव्रतासारखे चालवीत आहेत.
महिलोन्नती हासुद्धा तुकडोजी महाराजांच्या विचारविश्वाचा एक लक्षणीय पैलू होता. कुटुंबव्यवस्था, समाजव्यवस्था, राष्ट्रव्यवस्था ही स्त्रीवर कशी अवलंबून असते, हे त्यांनी आपल्या कीर्तनांद्वारे समाजाला पटवून दिले. त्यामुळे स्त्रीला अज्ञानात व दास्यात ठेवणे कसे अन्यायकारक आहे, हे त्यांनी अत्यंत प्रभावीपणे पटवून दिले.
देशातले तरुण हे राष्ट्राचे भावी आधारस्तंभ. ते बलोपासक असावेत म्हणजे ते समाजाचे व राष्ट्राचे संरक्षण करू शकतील. ते नीतिमान व सुसंस्कृतयुक्त कसे होतील, याविषयीचे उपदेशपर व मार्गदर्शनपर लेखन तुकडोजींनी केले. या राष्ट्रसंताने आपल्या लेखनातून व्यसनाधीनतेचा तीव्र निषेध केला. ऐहिक व पारलौकिक यांचा सुंदर समन्वय तुकडोजी महाराजांच्या साहित्यात झाला आहे. त्यांनी मराठीप्रमाणेच हिंदी भाषेतही विपुल लेखन केले. आजही त्यांचे हे साहित्य आपल्याला मार्गदर्शन करीत आहे, यावरून त्यांच्या साहित्यात अक्षर वाङमयाची मूल्ये कशी दडली आहेत, याची सहज कल्पना येईल. राष्ट्रपतिभवनात झालेले त्यांचे खंजिरी भजन ऐकून राष्ट्रपती राजेंद्रप्रसाद यांनी तुकडोजी महाराजांना राष्ट्रसंत म्हणून संबोधिले होते. तुकडोजी महाराजांचे महानिर्वाण आश्विन कृष्ण पंचमी शके १८९० ला म्हणजेच ११ ऑक्टोबर १९६८ रोजी झाले.
देवाने अवतार घेऊन आपला उद्धार करावा अशी अवाजवी अपेक्षा न करता समतावाद अवलंबला, सगळ्यांशी न्यायाने वागले तर गाव मागे राहणारच नाही. सणवार कसे साजरे करावे, कसे राहावे, जबाबदाऱ्या कशा पार पडाव्या, एकाच वेळी लग्नसमारंभ पार पाडणे, सर्वांनी सर्वस्व द्यावे, अबालवृद्धांशी प्रेमाने वागावे, एकमेकांना संकट काळात मदत करावी, घराघरात कसे वागावे, जयंती-पुण्यतिथी इ. सामुदायिक कार्यक्रम कसे करावे याची महाराजांनी ग्रामगितेत दिलेली मार्गदर्शक तत्वे पाळली तर गाव भूवैकुंठ होईल यात शंकाच नाही. एकत्र गुण्यागोविंदाने एकमेकास अंतर न देता संपूर्ण गावाला एक कुटुंब समजून द्वेष, वैर, दंभ, मत्सर न बाळगता मित्रतेने आपण सर्व एकाच



देवाची लेकरे आहोत असे समजून जिव्हाळ्याने ग्राम कुटुंबाचा विचार केल्यास जनतेचा सर्वांगीण विकास होईल. मनात सगळ्यांनी आत्मोन्नतीची तळमळ बाळगून संत समागमाने वैराग्य भावनांची वृद्धी करत, प्रयत्न करीत राहिल्यास प्रयत्नांनी गाव स्वर्गतुल्य करता येईल असे अनेक मार्गदर्शक तत्वे तुकडोजी महाराजांनी आपल्या ग्रामगीतेत ओवीबद्ध करून मांडले आहेत. ग्रामगीता या ग्रंथात तुकडोजी महाराज म्हणतात :

**संत देहाने भिन्न असती । परि ध्येय धोरणाने**
**अभिन्न स्थिती ।। साधने जरी नाना दिसती ।**
**तरी सिद्धान्तमति सारखी ।।**

समस्त लोकांनी ग्रामस्वच्छता अंगी बाणावी या करिता तुकडोजी महाराजांचा जन्मदिवस हा ग्रामस्वच्छता दिवस पाळून ग्रामाची स्वच्छता करून हा दिवस ग्रामजयंती म्हणून साजरा केला जातो. आधि केले मग सांगितले या उक्तीनुसार कार्य करणारे तुकडोजी महाराजही स्वतः हातात झाडू, घमेले घेऊन गावात स्वच्छता करायचे.

**राजास जी महाली, सौख्ये कधी मिळाली ।**
**ती सर्व प्राप्त झाली, या झोपडीत माझ्या ॥**
**भूमीवरी पडावे, तार्‍यांकडे पहावे ।**
**प्रभुनाम नित्य गावे, या झोपडीत माझ्या ॥**

एखादया राजाला राजमहालात जी सुखे मिळाली असतील, ती सर्व सुखे माझ्या झोपडीत मला लाभली आहेत. अंगणातल्या जमिनीवर आरामात निजण्याचे नि रात्री आकाशातील चांदण्यांकडे, ताऱ्यांकडे पाहण्याचे सुख मला या झोपडीत मिळते. देवाचे भजन नेहमी गात या झोपडीत मी आनंदात राहतो सांगणारे तुकडोजी महाराज झोपडीतल्या साध्या राहणीत सुखसमृद्धी, शांती आणि मानसिक सुख लाभते हे समजवतात. पैसा, दौलत, श्रीमंती हे चोरीला उत्तेजन देणारे घटक आहेत; परंतु गरिबाच्या मनातील निर्मळ भाव हा त्यास अभय देतो हा संदेश इतक्या सोप्या सहज ओठात रुळणाऱ्या शब्दांत मांडला आहे की, ही ओवी सतत गुणगुणाविशी वाटते. राष्ट्रसंत सांगतात, गाव व्यसनमुक्त असावे, गावातील बालक, तरुण, वृध्दांना आरोग्य लाभण्यासाठी प्रत्येक गावात व्यायामशाळा असावी. गाव तेथे वाचनालय असावे. आपल्या कृषीप्रधान देशातील शेतकरी खरा अन्नदाता असल्याने तो कर्जबाजारी होऊ नये. बळीराजा सतत उद्योगी, उत्साही, सुखी-संपन्न व्हावा. गावागावात भरपूर वृक्ष असावेत, गाव कचरामुक्त असावे, गावात रस्ते, पाणी, वीज, आरोग्यसेवा, शिक्षणाची उत्तम, दर्जेदार व्यवस्था असावी असे राष्ट्रसंतांनी आपल्या ग्रामगीतेतून गावाचा विकास कसा साधावा हे सांगितले आहे. ग्रामगीता स्वतः वाचल्यावर ग्रामगीता फक्त गावाचेच नव्हे तर देशाच्या सेवेचे संस्कृतीचे प्रतिक का आहे याची प्रचिती येते. तुकडोजींनी सामान्य माणसाला, श्रमजीवी ग्रामीणांना सन्मानाने जगणे शिकविले. खेड्यांना आत्मभान दिले. आपल्या खंजिरीने शाश्वत जीवनमूल्यांचा जागरही केला.

**अरे ! रिकामा कशाला फिरत ?**
**तुझं गावच नाही का तिर्थ? ।।**
**गावी राहती गरीब उपवासी ।**
**अन्न छत्र लावतोशी काशी ।।**
**हे दान ! नव्हे का व्यर्थ? ।।**
**तुझ्या गावाची शाळाही मोडली ?**
**धर्मशाळा का शहरी तु जोडली ?**
**याने निघतो का जीवनात अर्थ ? ।।**

काही लोक तीर्थ, यात्रा आणि वारी यात श्रम आणि पैसा नाहक वाया घालवतात त्यामुळे आपल्याला पुण्य लाभते असे ते समजतात. दुसरीकडे गावातील लोक उपाशी मारतात. तीर्थक्षेत्री केलेल्या अन्नदानापेक्षा गावातील लोकांना अन्नदान करून तृप्त करावे. धर्मशाळांसाठी आपला पैसा खर्च करण्यापेक्षा तो पैसा गावातील शिक्षण, आरोग्य आणि उद्योग-व्यवसायासाठी खर्च केल्यास खऱ्या अर्थाने गावाचा विकास केल्यास खरे पुण्य लाभेल असे महाराज आपल्या भजनातून सांगतात.

**या भारतात बंधूभाव नित्य वसू दे । दे वरची असा दे । हे सर्व पंथ - संप्रदाय एक दिसू दे , मतभेद नसू दे ।। नांदोत सुखे गरिब अमिर एक मतानी । मग हिंदु असो ख्रिश्चन वा हो इस्लामी । स्वातंत्र्य सुखा या सकला माजि वसू दे । दे वरचि असा दे ।**

अशा शब्दात अबालवृद्धांवर खंजरीच्या माध्यमातून आपल्या पहाडी आवाजात भजने गाऊन राष्ट्रभक्ती, मानवधर्म, आत्मोन्नती तथा विश्वशांतीचे संस्कार करणाऱ्या समाजसुधारक महामानवास शत शत नमन.

# जागर स्त्री शक्तींचा



तृप्ती नितीन तोडकर
संपर्क क्र. 9322506052

आधुनिक केसरी

**शारदीय नवरात्र उत्सवात सर्वांनीच अगदी हिरीरीने भाग घेतला. महिलांनी अगदी नऊ दिवस वेगवेगळ्या रंगांचा आनंद घेतला. काही जणांना ते आवडलं, भावलं पण काहींना असं वाटलं कशाला ते नऊ दिवस नऊ रंग? मग ती महिला असो किंवा पुरुष. काहींना असंही जाणवलं की, माझ्या आई कडे नव्हते कधी असे रंग...असं म्हणून भावनेचा हळुवार रंग लावून घेतला. कोणाला वाटलं आताच्या बायकाचं बेताल झाल्यात... असं म्हणून द्वेषाचा रंग लावून घेतला. बऱ्याच लोकांना वाटलं नऊ रंगात न्हाऊन निघावं... तेवढेच आनंदाचे क्षण वेचून घ्यावेत ...**

त्यांनी स्वच्छंदी, आनंदाचा रंग लावून घेतला. कोणी महिलांसाठी मोफत चहा द्यायला सुरुवात केली ...त्यांनी सेवेचा/ माणुसकीचा रंग लावून घेतला.
काही लोकांनी उपवास करणाऱ्या महिला व पुरुषांना उपवासाचे पदार्थ वाटप केले. त्यांनी प्रेमाचा रंग लावून घेतला. काहींनी स्वतःच्या कामाला/ कार्याला प्राधान्य दिलं ...त्यांनी जबाबदारीचा रंग लावून घेतला. काहींनी शारदेची पूजा विधी करणं, आरत्या, प्रसाद, दांडिया, विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात रममाण झाल्या...त्यांनी समाधानाचा रंग लावून घेतला. काही लोकांना वाटलं मी 10 वर्ष झाले उपवास करते / करतो....त्यांनी अहंकाराचा रंग लावून घेतला. काहींनी अगदी मनापासून मानवाची, भगवंतांची सेवा करण्याचा प्रयत्न केला. त्यांनी नामसमरण, संत साहित्याचे चिंतन, श्रद्धेचा, विश्वासाचा जोगवा घेण्यात- देण्यात दंग झाले ...त्यांनी भक्तीचा रंग लावून घेतला. ह्या नऊ रंगात रंगून देखील जो कोणत्याही रंगात अडकला नाही तोच आनंदाने जीवन जगत असतो. त्यालाच खरे जीवनाचे वर्म समजले असे म्हणण्यात काही वावगे ठरणार नाही.

खरंतर शारदीय नवरात्र उत्सवात स्त्रियांच्या मध्ये असणारे षड्गुण- (ज्ञान, वैराग्य, लक्ष्मी, औदार्य, ऐश्वर्य, यश) रज, तम, सत्व या तीन गुणांनी जी प्रकृती बनलेली आहे या नऊ शक्तीचा जागर करणं, प्रत्येकाला स्वतः मधील या नऊ शक्तींची ओळख करून देणं हेच महत्वाचं कार्य नऊदिवसात व्हायला हवे, ह्याच नऊ गुणांच्या नऊ रंगात जर आपण न्हाऊन निघालो तर प्रत्येक जण आत्मसन्मानाने जीवन जगेल.

नेहमी असं दिसून येतं की बैलपोळ्या सारखं फक्त त्याच दिवसात आदर सन्मान करायचा, मग तो महिला दिन असो, मातृदिन असो की नवरात्र. असं न होता आधी स्त्री ने स्वतःचा मग इतरांनी स्त्रियांचा आत्मसन्मान जपला पाहिजे, आदर केला पाहिजे. मान्य आहे की, हाताच्या बोटावर मोजण्या इतक्या काही अशा स्त्रिया ही आहेत त्यांच्यामुळे संपूर्ण स्त्री वर्गाला त्या वणव्यातून जावं लागतं. बऱ्याच अंशी असं स्त्रियांना देखील वाटतं आपणच कशाला स्त्रियांना बोल लावायचे, समाज काय कमी आहे का? आपणच स्त्री म्हणून वास्तव स्वीकारू तेंव्हा च आपणच आपला आणि समाज देखील आपला आदर नक्कीच करेल. स्त्रियांच्या अंतर्मनात एवढी ताकत असते की, त्यांनी नंदनवन करायचं ठरवलं तर त्या घराचं, परिसराचं, कर्तव्याच्या ठिकाणांचं नंदनवन करू शकतात. पण स्त्रियांनी एखाद्याचा विध्वंस करायचं ठरवलं तर तो केल्याशिवाय त्या शांत ही होत नाहीत. म्हणून खऱ्या अर्थाने या शक्तीचा जागर करणे, स्त्री मनातील सकारात्मकता वाढवणे यासाठी शारदीय उत्सव साजरा व्हावा. या शारदीय महोत्सवात ज्ञान, वैराग्य, लक्ष्मी, औदार्य, ऐश्वर्य, यश, रज, तम, सत्व या नऊ रंगांचा, नऊ शक्तींना सकारात्मक वृत्तीने



जागृत करणं आवश्यक आहे.
वैराग्य वैराग्य म्हणजे सर्वच जबाबदाऱ्या सोडून बाहेर पडणे म्हणजे वैराग्य नव्हे तर माझे कुटुंब, मीच वाढवलेल्या माझ्या जबाबदाऱ्या उत्तम रित्या पार पाडून दुसऱ्याच्या आनंदावर गदा न आणता मी माझा आनंद घेणे आणि एवढं सगळं करूनही हे मी न करता भगवंतांची सत्ता आहे त्यामुळे हे सगळं होऊ शकलं हे स्वीकाराने त्यालाच संत वैराग्य म्हणतात. माऊलींनीही ज्ञानेश्वरीत सांगितले आहे,
**"हे मजिस्तव झाले | तरी म्या नाही केलें || ऐसें जेणों जाणितले | तो सुटला गा ||**
अशी असावी पहिली माळ नि पहिला रंग, असे वाटते.
ज्ञान आपल्यात असणारा तो भगवंत ज्ञानी आहे त्यालाच सर्व कळतं, ज्ञानी तोच आहे. त्याच्या सत्तेमुळेच या जगताचे, व्यावहारीक गोष्टींचे ज्ञान होते हे समजून घेतले की पोटभरीच्या ज्ञानाचा अहंकार होत नाही. मग दररोज एक नवीन गोष्ट शिकावी व एक चुकीची सवय नष्ट करावी ही असावी दुसरी माळ नि दुसरा ज्ञानाचा रंग.
लक्ष्मी आपल्याला नेहमी असं वाटतं हातात पैसा खेळता राहणं म्हणजे लक्ष्मी आहे. तसं न विचार करता दुसऱ्याच्या आयुष्यात आनंदाची पेरणी करणं, सढळ हाताने, मोकळ्या मनाने खरंच गरज असणाऱ्यास मदत करणं, इतरांच्या सेवेसाठी तत्पर असणं, जे होईल ते चांगल्यासाठीच असा विश्वास मनामनात निर्माण करणं हीच तर खरी लक्ष्मी आणि तिसरी माळ व तिसरा रंग असावा असे वाटते.
औदार्य आपलं कोणीही नसो पण आपण मात्र सगळ्यांचं व्हावं, संयम आणि सहनशीलता ठेवून विवेकाने दुःखी जीवास सुखाचे क्षण सहज वाटत जावं, फक्त स्वतःची मर्यादा सांभाळून एका मर्यादेपर्यंत सहकार्य करणं म्हणजेच चौथी माळ नि चौथा रंग असावा असे वाटते.
ऐश्वर्य आरोग्यसंपत्ती सारखे कोणतेच ऐश्वर्य नाही याची उकलन जेवढ्या लवकर होईल तेवढे आपण मोह मायेच्या बाजारातून मोकळे होऊ.
यश यशाच्या व्याख्या अनेक आहेत पण ज्याला प्रपंच, नोकरी, स्वानंद, स्वतःच्या कर्तव्य व जबाबदाऱ्या सहजपणे सांभाळता आल्या तीच व्यक्ती खरंतर यशस्वी असते. तोच रंग सर्वात उठावदार व आकर्षक असतो.
रज आपली प्रकृती कशी आहे? हेच बऱ्याच वेळा लक्षात येत नाही. रजोगुणी म्हणजेच माझ्या आयुष्यात सर्व काही छान झालं पाहिजे पण ते इतरांनी करावं माझ्यासाठी असा अट्टाहास असतो. नाहीतर मी कसा सर्वश्रेष्ठ हाच भाव मनी धरून जगणं सुरू असतं. यात थोडासा बदल करून मला स्वतःसाठी व इतरांसाठी सकारात्मक काय करता येईल तो विचार दृढ केला तरच हा रंग जीवनात शांतता व समाधान घेऊन येईल.
तम आपल्याला स्वतः सोडून इतर सर्वांचा राग येतो, कारण नसतानाही आपण विचलित व क्रोधीत होतो. यात थोडा बदल केला तर स्वतःचा अधिक राग यायला हवा, मी स्वतः आनंदी राहत नाही, सतत कटकट तरी नाहीतर किरकिर तरी यात जाणीव पूर्वक बदल करून व्यक्तिमत्वात बदल केला तर आजूबाजूचे वातावरण बदलल्या शिवाय राहणार नाही. तेंव्हा हा रंग उजळ माथ्याने जगण्यास नक्कीच मदत करेल.
सत्व हा सत्वगुण म्हणजेच आंधळ्याच्या हाती कावळा लागावा असा असतो काहींकडे. वरील नऊ दिवस, वरील नऊ रंगांची उधळण च मुळी सत्व गुण वाढविण्यासाठी करायची असते. ज्याच्या जवळ सत्व आहे ती व्यक्ती शांत, समाधानी, आनंदी, स्थिर मनाची, प्रेमळ, विवेकी, सहनशील असते.

स्त्री मनातील या नऊ शक्तींना सकारात्मक भावनेने, विश्वासाने जागृत केले तरच आनंदाचा दसरा साजरा करता येईल. आनंदोत्सव साजरा करूनही ज्याच्या अंतर्मनात या नऊ शक्तींचा जागर सुरू राहील, दृढ निश्चय होईल तेव्हा शरद पौर्णिमेला आरोग्यमं धनसंपदा लाभल्याशिवाय राहणार नाही, कारण मनाचे आरोग्य उत्तम असेल तरंच शरीराचे आरोग्य उत्तम राहते. तेव्हा खऱ्या अर्थाने कोजागिरी पौर्णिमा साजरी होईल. यावर संत कबीर म्हणतात,

**जलसे पतला कौन है |**
**कौन भूमी से भारी |**
**कौन अगन से तेज है |**
**कौन काजल से काली ||**
**जल से पतला ज्ञान है |**
**पाप भूमी से भारी |**
**क्रोध अगन से तेज है |**
**कलंक काजल से काली ||**

# मा.खा. अनंतराव देशमुख यांच्या भगीरथ प्रयत्नांमुळे पैनगंगा भरणार काठोकाठ

## ॲड. नकुल देशमुख : पैनगंगा बॅरेजेसचा मार्ग मोकळा

आधुनिक केसरी न्यूज




**विनोद पाटील खडसे**

**रिसोड :** शेती सिंचनासाठी कोल्हापूरची ओळख संपूर्ण देशभर करून देणारे कोल्हापूर पद्धतीचे बंधारे गेल्या अनेक वर्षापासून रिसोड तालुक्यातील पैनगंगा नदीवर उभे आहेत. मात्र, देखभाली अभावी सदर बंधाऱ्यांची दैनाअवस्था झालेली आहे. संबंधित विभागाचा निष्काळजीपणा आणि लोकप्रतिनिधींचे उदासीन धोरण यामुळे सदर बंधाऱ्यांची, असून खोळंबा, नसून पंचाईत अशी अवस्था झाली आहे. परिणामी बंधाऱ्यातून होणारी सिंचन सुविधा कोलमडून पडली आहे. त्याचा दुष्परिणाम रब्बी हंगामातील गहू, हरभरा, तुर व इतर बागायती पिकावर मोठ्या प्रमाणात होत आहे. ही गंभीर बाब जिल्ह्यातील राजकारणाचे प्रभावी नेते माजी खासदार अनंतराव देशमुख यांच्या लक्षात येताच त्यांनी रिसोड येथे झालेल्या भाजपाच्या महासंकल्प सभेत राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निदर्शनात आणून दिली होती आणि सदर बंधाऱ्यांचे रूपांतर बॅरेजमध्ये करण्याची मागणी केली होती. त्यावेळी उपमुख्यमंत्र्यांनी पाणी उपलब्धतेचे प्रमाणपत्राची पूर्तता केल्यास बैरेजचे काम पूर्ण करून देण्याचे आश्वासन दिले होते. त्याअनुषंगाने माजी खासदार अनंतराव देशमुख यांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नामुळे पाणी उपलब्धतेचे प्रमाणपत्र जलसंधारण उपविभाग यांच्याकडून प्राप्त झाले असून, जिल्ह्यातील युवा नेते ॲड. नकुल देशमुख यांच्या पाठपुराव्यामुळे पैनगंगा नदीवरील कोल्हापुरी बंधाऱ्यांचे बॅरेज मध्ये रूपांतर करण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. तथापि,2515 अंतर्गत रिसोड मालेगाव तालुक्यातील ग्रामीण भागातील विकास कामांसाठी तब्बल 10कोटी15 लाख रुपयांचा निधी मंजुर करून आणला असल्याची माहिती ऍड. देशमुख यांनी माध्यमांना दिली आहे.

13 एप्रिल 2023 रोजी रिसोड येथील भव्य संकल्प सभेत माजी खासदार अनंतराव देशमुख व ॲड. नकुल देशमुख यांनी राज्याचे उपमुख्यमंत्री तथा भाजपाचे नेते देवेंद्र फडणवीस यांच्याकडे रिसोड, मालेगाव



तालुक्यातील ग्रामीण भागासाठी 25 15 या योजनेअंतर्गत अनेक विकास कामांसाठी निधी उपलब्ध करून देण्याची मागणी केली होती. सदर कामांना उपमुख्यमंत्री फडणवीस आणि राज्याचे ग्रामविकास मंत्री गिरीश महाजन यांनी मंजुरात दिली असल्याची माहिती सुद्धा यावेळी देण्यात आली आहे. तद्वतच रिसोड तालुक्यातील पैनगंगा नदीवरील कालबाह्य झालेले कोल्हापुरी बंधाऱ्याचे बॅरेज मध्ये रूपांतर होण्याचा मार्ग मोकळा झाल्यामुळे, तालुक्यातील शेतकऱ्यांची बऱ्याच वर्षापासूनची मागणी पूर्ण होणार आहे. तालुक्यातील येवती, आसेगाव पेन, चिचंबा पेन, धोडप, भापूर आणि बाळखेडा या सहा कोल्हापुरी बंधाऱ्यांचे बॅरेजमध्ये रूपांतर करण्याची कार्यवाही करण्याचे आदेश उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहेत. शेतकऱ्यांचा अत्यंत जिव्हाळ्याचा प्रश्न मार्गी लागल्यामुळे रिसोड तालुक्यातील शेतकरी समाधान व्यक्त करत आहेत. शेकडो हेक्टर जमीन सिंचनाखाली येणार असल्याने, माजी खासदार अनंतराव देशमुख यांच्या भगीरथ प्रयत्नामुळेच रब्बी हंगामात पैनगंगा नदी काठोकाठ भरणार असल्याचे तालुक्यातील शेतकरी बोलत आहेत. शिवाय, रिसोड मालेगाव तालुक्यातील अनेक गावांना जोडणाऱ्या रस्त्यांची दयनीय अवस्था झालेली आहे. त्यासाठी 25 15 अंतर्गत तब्बल 10 कोटी 15 लाख रुपयांचा निधी ॲड. नकुल देशमुख यांनी उपमुख्यमंत्री फडणवीस व ग्रामविकास मंत्री महाजन यांच्याकडून मंजूर करून घेतला असून, लवकरच विकास कामांना सुरुवात होणार असल्याची माहिती ॲड. देशमुख यांनी माध्यमांच्या प्रतिनिधींना दिली आहे.

# परिवर्त मराठी साहित्य परिषदेची तयारी पूर्ण

आधुनिक केसरी न्यूज

**नाशिक :** येथील परिवर्त बहुउद्देशीय संस्थेतर्फे पाच नोव्हेंबर रोजी परिवर्त मराठी साहित्य परिषदेचे आयोजन शहरातील रोटरी क्लब सभागृहात करण्यात आले आहे. या परिसराला राजा ढाले साहित्य नगरी आणि विचारपीठाला विद्रोही कवी स्मृतीशेष धुरंधर मिठबावकर असे नाव दिले आहे. प्रसिद्ध साहित्यिक प्रा. डॉ. बजरंग बिहारी तिवारी (दिल्ली) हे परिषदेचे अध्यक्ष असून, प्रसिद्ध लेखक तथा ज्येष्ठ पत्रकार ज्ञानेश महाराव हे परिषदेचे उद्घाटन करणार आहेत. यावेळी स्वागताध्यक्ष उद्धव गांगुर्डे, कार्यवाह साहित्यिक प्रा. गंगाधर अहिरे, सचिव दिनकर पवार आणि कवी अमोल बागूल उपस्थित असतील. उद्घाटन सत्रात महाकवी वामनदादा कर्डक स्मृती 'वादळवारा' सन्मान डॉ. सागर जाधव, राजा ढाले स्मृती 'वैचारिक संशोधन' पुरस्कार महेंद्र गायकवाड आणि कवी अरुण काळे स्मृती 'अजातशत्रू' पुरस्कार कवी अशोक पळवेकर यांना प्रदान केला जाणार आहे.

दुसऱ्या सत्रात प्रा. ईसादास भडके यांच्या अध्यक्षतेखाली 'वर्तमान स्थितीत : विवेकशील लेखकांची भूमिका' या विषयावर परिसंवाद होईल. तर तिसऱ्या सत्रात जिल्ह्यातील निवडक कलावंत व साहित्यिकांना सन्मानित केले जाणार आहे. समारोपाच्या सत्रात कवयित्री छाया कोरेगांवकर यांच्या अध्यक्षतेखाली निमंत्रितांचे कविसंमेलन होईल. त्यात अविनाश गायकवाड, मनीष तपासे, ॲड. अशोक बनसोडे, काशिनाथ वेलदोडे, अलका कुलकर्णी आदींचा समावेश असणार आहे. चित्रकार देवेंद्र उबाळे यांचे चित्र प्रदर्शन व शिल्पकार दीपक भालेराव यांचे शिल्पांचे प्रदर्शन आणि पुस्तक विक्रीचे कक्षही परिषद स्थळी असणार आहे.

# शेतात ३ कोटींचा गांजा केला जप्त...!

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** शिरपुर तालुक्यातील एका लाकडी हनुमान परिसरात शेतावर एलसीबीच्या पथकाने छापेमारी करत सुमारे ३ कोटी रुपयांचा गांजा जप्त केला आहे गेल्या काही दिवसानंतर ही सर्वात मोठी कारवाई मानली जात आहे.
त्या मालकाविरुध्द पोलिसात गुन्हा नोंदविण्यात आला आहे. ही कारवाई करणाऱ्या एलसीबीच्या पथकाला पोलिस अधिक्षक संजय बारकुंड यांनी २० हजार रुपयांचे रोख बक्षीस जाहीर केले आहे शिरपूर तालुक्यातील लाकड्या हनुमान येथे राहणाऱ्या देवा कहारु पावरा याने तेच्या शेतात गांजाची बेकायेदशिररित्या लागवड केल्याची माहिती एलसीबी पीआय दत्तात्रय शिंदे यांना गुप्त बातमीदारामार्फत मिळाली. या बातमीची खातरजमा करत पीआय शिंदे यांनी पीएसआय बाळासाहेब सूर्यवंशी आणि एलसीबीच्या पथकाला कारवाईचे आदेश दिले. एलसीबीच्या पथकाने देवा पावरा हा कसत असलेल्या शेताचा शोध घेवून शेतात तुर आणि कापूस या पीकाच्या मध्यभागी गांजाची लागवड केल्याचे आढळून आले. ३ कोटी १० लाख रुपये किंमतीचा ६ हजार २ किलो वजनाची १८६० गांजाची झाडे एलसीबीच्या पथकाने जप्त केली आहे. नाशिक परिक्षेत्राचे विशेष पोलिस महानिरीक्षक डॉ. बी. जी. शेखर, एसपी संजय बारकुंड, अपर पोलिस अधिक्षक किशोर काळे, डीवायएसपी सचिन हिरे यांच्या मार्गदर्शनाखाली एलसीबी पीआय दत्तात्रय शिंदे, एपीआय जयेश खलाणे, पीएसआय बाळासाहेब सूर्यवंशी, सुनिल वसावे, पोना पंकज खैरमोडे, महेंद्र सपकाळ, मयुर पाटील, योगेश जगताप, किशोर पाटील, जगदीश सूर्यवंशी, देवेंद्र ठाकुर,राजु गिते, राजु भिसले, स्वप्नील बांगर, प्रकाश अहिरे यांच्या पथकाने कारवाई केली.





# सिद्धांत वेलफेअर फाउंडेशनने केली विद्यार्थ्यांची मोफत आरोग्य तपासणी

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** येथील सामाजिक बांधिलकी जपणाऱ्या सिद्धांत वेलफेअर फाऊंडेशनच्या वतीने बुधवार (ता.०१)रोजी संत रोहिदास मागास मुलांचे वसतिगृह व मदर तेरेसा मागासवर्गीय मुलींच्या वस्तीगृहातील गोर, गरीब मागासवर्गीय मुलां-मुलींची मोफत आरोग्य तपासणी करून गरजू विद्यार्थ्यांना मोफत औषधी ही वाटप करण्यात आली. अध्यक्षस्थानी आ. रमेश, पा. बोरनारे यांचे बंधू संजय बोरनारे होते तर प्रमुख पाहुणे सामाजिक कार्यकर्ते धोंडीरामसिंह राजपूत होते. शिवसेना शहर प्रमुख पारस घाटे, नगर सेविका माधुरी दशरथ बनकर, जयश्री दिनेश राजपूत व नाईकवाडी यांची उपस्थिती होती. आरंभी या फाउंडेशनचे अध्यक्ष डॉ. संतोष गंगवाल यांनी प्रास्ताविक केले.

डॉ. गंगवाल व डॉ. जैन यांनी विद्यार्थ्यांचे वजन करून आरोग्य तपासणी केली व गरजू विद्यार्थ्यांना पाहुण्यांच्या हस्ते मोफत औषधी वाटप करण्यात आली,या प्रसंगी १०० विद्यार्थ्यांची तपासणी झाली. सूत्र संचलन या वस्तीगृहाचे अण्णासाहेब ठेंगडे यांनी केले, सौ,ठेंगडे यांनी आभार मानले. या प्रसंगी सौ. गंगवाल यांची उपस्थिती होती.

# महाराष्ट्र राज्य नगरपरिषद, न.पं. कर्मचारी, संवर्ग कर्मचारी संघर्ष समितीचे उपोषण

## उपोषणाचा पाचवा दिवस, तरीही मागण्या प्रलंबितच

आधुनिक केसरी न्यूज

**उरण :** महाराष्ट्र राज्यातील नगरपरिषदा, नगरपंचायतीमधील कर्मचाऱ्यांच्या दिर्घकाळापासून प्रलंबित असलेल्या मागण्यांवर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आपल्या अध्यक्षतेखाली दि. २०/०३/२०२३ रोजी विधान भवन, मुंबई येथे घेतलेल्या बैठकीमध्ये झालेल्या चर्चेच्या वेळी राज्यातील नगरपरीषद, नगरपंचायतीमधील कामगारांच्या प्रलंबीत मागण्यांवर सकारात्मक निर्णय घेतले होते. या बैठकीमध्ये राज्याचे मुख्य सचिव मनुकुमार श्रीवास्तव, वित्त सचिव मनोज सौनीक, सामाजिक न्याय विभाग सचिव सुमंत भांगे, नगरविकास विभाग प्रधान सचिव श्रीमती सोनिया सेठी, महाराष्ट्र नगरपरीषद, नगरपंचायत आयुक्त तथा संचालक डॉ. किरण कुलकर्णी हे उच्च पदस्थ अधिकारी उपस्थित होते. यांच्या समक्ष राज्यातील नगरपरीषद,



नगरपंचायतीमधील कामगारांच्या प्रलंबीत मागण्यांवर चर्चा होऊन निर्णय झाले आहेत. या निर्णयांची अंमलबजावणी करण्याकरिता गेले ७ महिने सातत्याने पत्रव्यवहार तसेच प्रत्यक्ष भेटून चर्चा करूनही सदर प्रश्न या राज्याचे मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे यांनी मार्गदर्शक सुचना आदेश देऊनही तसेच या संदर्भातले इतिवृत्त लेखी स्वरूपात असतानाही या विषयांची गेले ७ महिने अंमलबजावणी न झाल्यामुळे या व इतर काही महत्त्वाचे प्रदिर्घ काळापासून प्रलंबित असलेल्या प्रश्नांच्या सोडवणूकीकरीता तसेच मा. महाराष्ट्र शासनाचे आणि मा. संचालक कार्यालयाचे लक्ष वेधण्यासाठी संविधानातील तरतुदींनुसार सनदशिर मार्गाने स्वतःलाच आत्मक्लेश करून घेण्याकरीता दि. ३०/१०/२०२३ रोजी मा. आयुक्त तथा संचालक, संचालनालय सी.बी.डी. बेलापूर या कार्यालयासमोर महाराष्ट्र राज्य नगरपरिषद आणि नगरपंचायत कर्मचारी, संवर्ग कर्मचारी, संघर्ष समितीच्या वतीने 'आमरण उपोषण' सुरु करण्यात आले आहे.उपोषणाचा आज दिनांक ३ नोव्हेंबर २०२३ रोजी उपोषणाचा पाचवा दिवस आहे.कर्मचाऱ्यांना न्याय न मिळाल्यास सदर उपोषण व लढा कायदेशीर मार्गाने अधिक तीव्र करण्यात येईल असा आक्रमक इशारा महाराष्ट्र राज्य नगरपरिषद, नगरपंचायत कर्मचारी व संवर्ग कर्मचारी संघर्ष समितीचे महाराष्ट्र राज्याचे मुख्य संघटक संतोष पवार यांनी प्रशासनाला दिला आहे.प्रशासनाने सदर उपोषण कर्त्यांना बैठकीला बोलाविले आहे. या बैठकीत कोणता तोडगा निघतो हे बघणे महत्वाचे ठरेल.

राज्यातील नगरपरिषदा, नगरपंचायतीमधील कर्मचाऱ्यांमध्ये मागण्या पूर्ण होत नसल्याने शासना विरोधात असंतोषाची लाट पसरली आहे . या संपूर्ण परिस्थितीला विचारात घेवून सोमवार, दि . ३०/१०/२०२३ रोजी मा . आयुक्त तथा संचालक कार्यालयासमोर आमरण उपोषण करण्याचा निर्णय संघर्ष समितीने घेतला आहे .त्याप्रमाणे उपोषण सुरु सुद्धा आहे .उपोषणाचा आज दिनांक ३/११/२०२३ रोजी ५ वा दिवस आहे . प्रश्न न सुटल्यास राज्यातील नगरपरिषदा आणि नगरपंचायती कोणत्याही दिवशी बेमुदत संपावर जातील . यामुळे या काळात कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाल्यास त्यास नगरविकास विभाग आणि संचालक कार्यालय यास पुर्णपणे जबाबदार असणार आहे .उपोषण कर्त्यांना महाराष्ट्र शासनाने बैठकीला बोलाविले आहे . जर योग्य तोडगा निघाला तर ठिक अन्यथा उग्र उपोषण करू .

**–संतोष पवार, महाराष्ट्र राज्य, मुख्य संघटक .महाराष्ट्र राज्य नगरपरिषद, नगरपंचायत कर्मचारी व संवर्ग कर्मचारी संघर्ष समिती .**



# रुग्णालयाने घेतला मोकळा श्वास

## गवत, झुडपे, पाला, पाचोळा, प्लास्टिक बॅग्ज केल्या गोळा

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** येथील उपजिल्हा रुग्णालय परिसरात गेल्या अनेक महिन्यापासून चोहो बाजूनी घाणीचे साम्राज्य आहे. पाला, पाचोळा, प्लास्टिक बॅग्ज, कॅरी बॅग्ज, झुडपे, गवत, पाण्याच्या बाटल्या, प्लास्टिक ग्लास यांनी येथील आंतर रुग्ण व बाह्य रुग्ण याना भयंकर त्रास होता.

आजार बरे होण्यापेक्षा आजार बळावत होते,या रुग्णालयात वारंवार भेटी देऊन या सर्व घाणीचा, अस्वच्छतेचा अनुभव आ.रमेश पा. बोरनारे यांनी ही अनुभवला. वाढत असलेली दुर्गंधी, अस्वच्छता पाहून आ,रमेश पा,बोरनारे यांच्या ग्रुपच्या वतीने बुधवार(ता.०१)रोजी उप जिल्हा रुग्णालयाचा संपूर्ण बाह्य परिसर स्वच्छता करण्यास प्रारंभ झाला. पालिकेचे स्वच्छता दूत धोंडीरामसिंह राजपूत यांच्या उपस्थितीत स्वच्छता मोहीम सुरू झाली. या समयी संजय बोरनारे, रणजित चव्हाण, अमोल बोरनारे, बाळासाहेब जाधव, अतुल कुंदे, निलेश चाफेकर, आरोग्य कर्मचारी चौधरी, पाटील, पवार यांनी तीन तास उपजिल्हा रुग्णालयाच्या बाह्य परिसरातील झुडपे, पाला पाचोळा, प्लॅस्टिक व कॅरी बॅग्स, केरकचरा, सर्व परिसर चकाचक केला व या घाणीची योग्य विल्हेवाट लावली. राजपूत यांनी आ,बोरनारे यांच्या टीमला धान्यवाद दिले.

# मराठा समाजातील शेतकऱ्यांचे आमदार प्रा. फरांदेंना समर्थन

## जायकवाडीला पाणी न सोडण्याची घेतली होती भूमिका

आधुनिक केसरी न्यूज

**विक्रम पासलकर**

**इगतपुरी :** गेल्या काही दिवसांत राज्यात मराठा आरक्षणप्रश्नी



सर्वच लोकप्रतिनिधीं विरोधात आंदोलक आक्रमक झाले असतांना दुसरीकडे नाशिकमध्ये मात्र मराठा समाजातील तरूण शेतकऱ्यांनी नाशिक मध्यच्या भाजप आमदार देवयानी फरांदे यांची भेट घेत जायकवाडीला पाणी न सोडण्याच्या त्यांनी घेतलेल्या कठोर भूमिकेला समर्थन देत पाठींबा दर्शवला असल्याचे काल दिसुन आले. त्यामुळे एकिकडे आमदारांच्या कार्यालयांना टाळे ठोको आंदोलन व मराठा आरक्षणसाठी उपोषण, मोर्चे, निषेध सभा आदी प्रकारे आंदोलन करत असतांना लोकप्रतिनिधि यांना गावबंदी देखील केली असल्याचे राज्यभर जनतेने बघितले तर दुसरीकडे मात्र पाणीप्रश्नावरून सत्ताधारी गटाच्या आमदाराला पाठींबा दर्शविण्यात आला असल्याचेही एक सकारात्मक चित्र नाशिक जिल्ह्यात बघायला मिळाले आहे. वास्तविक लाभ क्षेत्रातील विहिरी कोरड्या ठाक असताना पाणी सोडणे उचित आहे का असा एक सवाल उपस्थित होतो,या प्रश्नावर लोकप्रतिनिधी यांनी सरकारला साकडे घालण्याची नित्तंत गरज होती. हीच बाब ओळखून आ प्रा देवयानी फरांदे यांनी जायकवाडीला पाणी सोडण्यास विरोध करून त्यावर स्थगिती आणल्यामुळे शेतरीवर्गामधून त्यांच्या विषयी एक आदर निर्माण झाला आहे.

यंदा सरासरी पेक्षा कमी पाऊस झाला,त्यामुळे एक ते दोन चांगल्या पावसाची आवश्यकता असताना पावसाने दड़ी मारली. म्हणून जिल्हयात सर्वच ठिकाणी दुष्काळजन्य परिस्थिती निर्माण झाली असतांना नाशिककरांचा विचार न करता नाशिकच्या गंगापूर व इगतपुरी तालुक्यातील ब्रिटिश कालीन दारणा धरण समूहातून ८.६०३ टीएमसी पाणी सोडण्याचे आदेश गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळाने दिले आहेत. मात्र या निर्णयाविरोधात जिल्ह्यातील एक केंद्रीय मंत्री,दूसरा खासदार आणि बहुतेक आमदारानी जाहिर उघड़ भूमिका न घेता शांत बसून शेतक-यांचा रोष ओढावउन घेतला. या उलट भाजपच्या नाशिक मध्यच्या आमदार देवयानी फरांदे यांनी मात्र पाणी प्रश्नावर आक्रमक पवित्रा घेतला असून नाशिक आणि नगर भागातील लाभार्थ्यांवर या चुकीच्या निर्णयामुळे अन्याय होईल अशी भूमिका मांडली. दरम्यान केवळ विरोध न नोंदवता आ. फरांदे यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी फोनवरून चर्चा करत वस्तुस्थिती त्यांना सांगितली. यंदाच्यवर्षी विशेष बाब म्हणून जायकवाडीच्या मृत साठयातून जायकवाडी जलाशयात ६५ टक्के उपयुक्त पाणीसाठा होण्यासाठी ५.९४ टीएमसी पाणीसाठा वापरण्यास शासनाने परवानगी द्यावी अशी मागणीही त्यांनी केली. गत अनुभव पाहता पाणी सोडल्यावर वहनतूट ४० ते ४५ टक्के येणार आहे. त्यामुळे जायकवाडीत यातील किती पाणी पोहचू शकेल, असा सवालही आ. फरांदे यांनी उपस्थित केला. त्यामुळे नाशिकमधून पाणी सोडण्याच्या निर्णयाला स्थगिती देण्याची मागणी त्यांनी केली आहे. त्यामुळे या निर्णयाला सध्या तरि स्थगिती दिल्याचे बोलले जात आहे. त्यामुळे इगतपुरी तालुक्यातील दारणा,भाम, भावली,वाकी-खापरी आणि मुकणे या धरनांचे पाणी सद्यस्थितित धरणामध्येच शाबूत राहणार आहे.

नाशिकमधून जायकवाडीला पाणी सोडल्यास याचा परिणाम शेती व्यवसायावर होणार आहे. त्यामुळे या निर्णयामुळे शेतकरीवर्ग आक्रमक झाला आहे. आमदार फरांदे यांनी याप्रश्नी नाशिककरांच्यावतीने विरोध नोंदवल्याने सिद्ध पिंप्री गावातील मराठा समाजाच्या शेकडो शेतकरी तरूणांनी आमदार फरांदे यांच्या नाशिकमधील निवासस्थानी त्यांची भेट घेत त्यांच्या भूमिकेला पाठींबा दर्शवत त्यांचे आभार मानले. पाणीप्रश्नी आम्ही आपल्यासोबत असल्याचे यावेळी सांगत शेतकऱ्यांनी दुष्काळी परिस्थितीबाबत वास्तव मांडले. तर इगतपुरी तालुक्यातुंन देखील आ फरांदे यांचे शेतकरी व नागरिकांनी आभार मानले आहे. यावेळी अनिल ढिकले, भाऊसाहेब ढिकले, शंकर ढिकले, मनोज जाधव, यशवंत ढिकले, जयराम ढिकले, नामदेव ढिकले, देविदास पाटील, पंडित जाधव, बाळासाहेब उखाडे, अंबादास ढिकले, उत्तम ढिकले आदींसह शेतकरी उपस्थित होते.




# पाडळी येथे नेत्यांना गावात प्रवेश बंदी

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** तालुक्यातील पाडळी येथे मुख्य सडकेवरील रस्त्यांवर मराठा आरक्षण जोपर्यंत मिळत नाही तोपर्यंत कोणत्याही राजकीय पक्ष व नेत्यांना गावात त प्रवेश दिला जाणार नाही सर्व पक्ष व राजकीय नेत्यांना प्रवेश बंदी देखील मराठा आरक्षण एकच असेल लक्ष आरक्षण मिळेपर्यंत येणाऱ्या सर्व निवडणुकांच्या मतदानावर बहिष्कार राहील एक मराठा लाख मराठा अशा आशयाचा फलक लावण्यात आला आहे. पाडळी समस्त ग्रामस्थ यांच्या वतीने हा फलक लावण्यात आला आहे.

# फुलंब्री तालुका दुष्काळग्रस्त जाहीर करा

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** तालुका दुष्काळग्रस्त जाहीर करावा, अशी मागणी तालुका भाजपच्या वतीने केली आहे. या संदर्भात बुधवारी तहसीलदार यांना निवेदन देण्यात आले. मागण्यांचे निवेदन तहसीलदार डॉ. कृष्णा कानगुले यांनी स्वीकारले. यावर्षी पाऊस अत्यल्प प्रमाणात पडल्यामुळे धरण, सिंचन विहीर, बोअरवेलचा पाणीसाठाही अत्यल्प आहे. त्यामुळे पिण्याच्या पाण्याचा तसेच जनावरांच्या चाऱ्याचाही प्रश्न निर्माण झाला आहे. सर्व संकटांचे निराकरण करण्यासाठी तत्काळ पंचनामे करून फुलंब्री तालुका दुष्काळग्रस्त जाहीर करावा. तसेच मागील वर्षीचे अतिवृष्टीचे अनुदान दीपावलीपूर्वी शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा करावे. शेतकऱ्यांच्या कुटुंबातील प्रलंबित असलेले वारस फेर रक्ताच्या नात्याचे वाटणी पत्रके तत्काळ मंजूर करावेत, अन्यथा भाजपच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येणार असल्याचा इशारा भाजपच्या वतीने दिला. याप्रसंगी भाजपचे जिल्हाध्यक्ष सुहास शिरसाट, तालुकाध्यक्ष सांडू जाधव, तारू अप्पा मेटे, शिवाजी पाथ्रीकर, शहराध्यक्ष योगेश मिसाळ, किसान मोर्चाचे तालुकाध्यक्ष राजू तुपे, राम बनसोड, वाल्मीक जाधव, व्यापारी संघटनेचे रवींद्र काथार, कैलास सोनवणे, देविदास काळे, श्यामराव मालोदे, कचरू गायके, दत्तू थोरात, रोशन अवसरमल आदींची उपस्थिती होती.

# समान व असमान निधी योजनांसाठी शासनमान्य ग्रंथालयांनी प्रस्ताव सादर करावे

आधुनिक केसरी न्यूज

**सुधाकर जेठे**

**फुलंब्री :** भारत सरकारच्या सांस्कृतिक कार्य विभागांतर्गत राजा राममोहन रॉय ग्रंथालय प्रतिष्ठान, कोलकाता यांच्या समान निधी व असमान निधी योजनेंतर्गत राज्यातील शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांच्या सर्वांगिण विकासासाठी अर्थसहाय्याच्या विविध योजना ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या मार्फत राबविण्यात येतात. सन २०२३ २४ साठी विविध समान व असमान निधी योजनांचा लाभ घेण्यासाठी राज्यातील शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांकडून विहित नमुन्यात प्रस्ताव मागविण्यात येत आहेत. त्या संदर्भातील नियम, अटी व अर्जाचा नमुना प्रतिष्ठानच्या WWW. RRIF.GOV.IN या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. इच्छुक ग्रंथालयांनी अर्जाचा नमुना संकेतस्थळावरुन उपलब्ध (DOWNLOAD) करुन घ्यावा. सन २०२३ २४ साठीच्या समान निधी योजना पुढील प्रमाणे आहेत. (MATCHING SCHEMES) १) इमारत बांधकाम व विस्तार अर्थसहाय्य योजना रु. २५.०० लाख टिपः- उपरोक्त योजने व्यतिरिक्त समान निधी योजनेंतर्गत इतर योजनांचा लाभ केंद्रीय पध्दतीने देण्यात येत असल्यामुळे इतर योजनेसाठीचे प्रस्ताव सादर करु नयेत. सन २०२२-२३ साठीच्या असमान निधी योजना पुढील प्रमाणे आहेत. (NON MATCHING SCHEMES) १) ग्रंथालय सेवा देणाऱ्या स्वयंसेवी संस्थांना ग्रंथ, साधन सामग्री, फर्निचर, इमारत बांधकाम व विस्तार यासाठी अर्थसहाय्य (फर्निचर खरेदी रु. ४.०० लाख व इमारत बांधकाम रु. १० ते १५.०० लाख) २) राजा राममोहन रॉय ग्रंथालय प्रतिष्ठान "ज्ञान कोपरा विकसित करण्यासाठी अर्थसहाय्य - (रु. २.५० लाख) व विशेष अर्थसहाय्य आधुनिकीकरण (रु. २.०० लाख) ३) महोत्सवी वर्ष जसे ५०/६०/७५/१००/१२५/१५० वर्ष साजरे करण्यासाठी अर्थसहाय्य - (६.२० लाख / च इमारत विस्तार रु. १०.०० लाख) ४) राष्ट्रस्तरीय चर्चासत्र, कार्यशाळा, प्रशिक्षण वर्ग व जागरुकता कार्यक्रम आयोजनासाठी अर्थसहाय्य (रु. १.५० लाख / रु. २.५० लाख रु. ३.०० लाख) बाल ग्रंथालय व राजा राममोहन रॉय ग्रंथालय "बाल कोपरा स्थापन करण्याकरीता अर्थसहाय्य (रु. ६.८० लाख) उपरोक्त योजनेसाठी करावयाचा अर्ज :- वरील योजनांचा लाभ घेण्यासाठी इच्छुकांनी प्रतिष्ठानचे WWW.RRRLF.GOV.IN हे संकेतस्थळ पहावे. आवश्यकता असल्यास संबंधित जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा. ग्रंथालयांनी वरील पैकी कोणत्याही एका योजनेसाठीचा प्रस्ताव विहित मार्गाने व मुदतीत आवश्यक कागदपत्रांसह इंग्रजी / हिंदी भाषेत चार प्रतीत संबंधित जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयास दि. ३०/११/२०२३ पर्यंत पोहचतील अशा बेताने पाठवावेत. असे आवाहन श्री. दत्तात्रेय आ. क्षीरसागर, ग्रंथालय संचालक, ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्र राज्य, नगर भवन, मुंबई यांनी राज्यातील शासनमान्य ग्रंथालयांना केले आहे.



# अष्टपैलू क्रिकेटपटू देविका वैद्यचा सत्कार

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** आशियाई क्रीडा स्पर्धेत सुवर्णपदक विजेत्या भारतीय महिला संघातील अष्टपैलू क्रिकेटपटू देविका वैद्य हिचा राष्ट्रीय स्वयंसेवक संघातर्फे सत्कार करण्यात आला.कर्वेनगर येथील देविका वैद्य हिच्या निवासस्थानी जाऊन सत्कार करण्यात आला. कर्वेनगर संघचालक उदयन पाठक यांनी देविका वैद्य हिचा पुष्पगुच्छ व पुस्तके देऊन सन्मान केला.

या प्रसंगी देविकाचे वडील पुर्नेंदू वैद्य यांचाही सत्कार केला. यावेळी मेघन बेलसरे,सुनील खेडकर, प्रकाश देशपांडे,सचिन अग्निहोत्री यांची उपस्थिती होती. देविका वैद्य ही अष्टपैलू महिला क्रिकेटपटू आहे. महाराष्ट्र महिला संघाकडून ती खेळत आहे.वयाच्या सातव्या वर्षापासून देविका ही क्रिकेट खेळ खेळत आहे. भारतीय अ महिला संघ,भारतीय महिला ग्रीन,महाराष्ट्र महिला वेलोसिटी या संघाकडून देविकी ही खेळते. २०१४-१५ मध्ये सर्वोत्कृष्ट महिला ज्युनियर क्रिकेटपटू म्हणून देविका वैद्य हिला एम. ए. चिदम्बरमट्रॉफी प्रदान करुन सन्मानित करण्यात आले आहे. २०१४ मध्ये दक्षिण आफ्रिका दौऱ्यासाठी देविकाची भारतीय महिला संघात निवड झाली होती. नोव्हेंबर २०१८ मध्ये वेस्ट इंडिजमध्ये आयसीसी महिला विश्वचषक टी २० स्पर्धेसाठी भारतीय संघात देविका वैद्य हिचा समावेश करण्यात आला होता.

चीनमध्ये झालेल्या नुकत्याच आशियाई क्रीडा स्पर्धेत क्रिकेट स्पर्धेत भारतीय महिला संघाने सुवर्णपदक जिंकले आणि या संघात देविका वैद्य हिचा समावेश होता.

देविकाने तायक्वांदो मध्ये ब्लॅक बेल्ट किताब मिळविला असून यामध्ये अनेक पारितोषिके मिळवली आहेत.देविका ला संगीतामध्ये आवड आहे तसेच फोटोग्राफी हा तिचा छंद आहे. सध्या ती युनायटेड किंग्डम मधील ओपन विद्यापीठातून बी. ए. सायकॉलॉजी शिकत आहे.

# बालरोग शल्यक्रिया तज्ज्ञांच्या राष्ट्रीय परिषदेला सुरुवात

## पहिल्या दिवशी २० पेक्षा जास्त शस्त्रक्रिया

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** बालकांवरील विविध शस्त्रक्रियांनी ४९ व्या बालरोगशल्यचिकित्सक आणि बालरोग मूत्रमार्ग शल्यचिकित्सकांच्या (पेडियाट्रिक सर्जन्स) राष्ट्रीय परिषदेस आज सुरुवात झाली. देशभरातून आलेल्या तज्ज्ञ शल्यचिकित्सकांनी सुमारे १२ शस्त्रक्रियांचे प्रात्यक्षिक दाखविले. विशेष म्हणजे य सर्व शस्त्रक्रिया मोफत करण्यात आल्या.
शहरात प्रथमच बालरोगशल्यचिकित्सक आणि बालरोग मूत्रमार्ग शल्यचिकित्सकांची राष्ट्रीय परिषद होत आहे. सुमारे ४०० प्रतिनिधी देशविदेशातून शहरात दाखल झाले आहेत. हा कुंभमेळा ५ नोव्हेंबरपर्यंत सुरु राहणार आहे. बालकांवरील शस्त्रक्रियांचे विविध पैलू, आधुनिक तंत्र आणि संशोधन अशा भरगच्च विषयांवर सलग चार दिवस मंथन या परिषदेतून होणार आहे. पहिल्याच दिवशी बालकांच्या मूत्रमार्गासहीत, टाळूला जीभ चिटकणे, आतड्यांचे विकार, यासहित विविध शस्त्रक्रिया तज्ज्ञांनी करुन दाखविल्या. एमजीएम रुग्णालयात या शस्त्रक्रिया झाल्या ज्याचे थेट प्रक्षेपण परिषदेच्या ठिकाणी करण्यात आले. शरिरावर कमीत कमी कट घेऊन तसेच दुर्बीण, आर्टिफिशियल तंत्र वापरुन शस्त्रक्रिया करुन बालकांना कमीत कमी वेदना होतील, शस्त्रक्रियेनंतर कमीत कमी रिकव्हरी होईल असे तंत्र आता विकसीत झाले आहे हे तंत्र जास्तीत जास्त शल्यचिकित्सकांपर्यंत पोहचवणे गरजेचे होते असे परिषदेच्या संयोजन समितीचे सचिव डॉ. राजगोपाल तोतला यांनी सांगितले. आज हैदराबादचे व्ही.व्ही.एस. चंद्रशेखरम, मुंबईचे डॉ. रसिक शहा, डॉ. हरिप्रकाश मिंगलानी यांच्यासह सुमारे दहा डॉक्टरांनी शस्त्रक्रिया करुन दाखविल्या. डॉ.अमेरिकेतून आलेले डॉ. थॉम लोब हे यावेळी उपस्थित होते. ऑनालाईन आणि प्रत्यक्ष सादरिकण अशा दोन विभागात संपूर्ण परिषदेचा कार्यक्रम विभाजीत करण्यात आला आहे. १०० च्या वर



संशोधन निबंध ऑनलाईन सादर होणार आहेत. त्याची सुरुवात २३ ऑक्टोबरपासूनच झाली आहे. तज्ज्ञांच्या पॅनलसमोर निबंध सादर करण्यात आले. त्यातून सर्वोत्कृष्ट निबंधांची निवड पारितोषिकांसाठी करण्यात येणार आहे. तसेच २३ ते ३१ऑक्टोबर पर्यंत ऑनलाईन पोस्टर प्रेझेंटेशन सादर झाले. शोधनिबंध आणि पोस्टर परिषदेच्या वेबसाईटवर सर्वांना पहाता येणार आहेत.

**उद्या औपचारिक उद्घाटन :** परिषदेचे उदघाटन उद्या ३ नोव्हेंबर रोजी संध्याकाळी ५ वाजता केंद्रिय अर्थराज्यमंत्री आणि छत्रपती संभाजीनगर संघटनेचे अध्यक्ष डॉ. भागवत कराड यांच्या हस्ते होणार आहे. दरम्यान सकाळपासूनच विविध सत्रांना सुरुवात होणार आहे. त्यात छातीच्या पडद्याची विकृती यावर अमेरिकेचे तज्ज्ञ सुंगून किम, बालरोगात स्टेमसेलचे महत्व या विषयावर दिल्लीतील डॉ. शिल्पा शर्मा आणि बंगलुरुच्या ॲटनी रॉबर्ट चार्ल्स यांचे बालशस्त्रक्रियांमधील निश्चितता आणि अनिश्चितता यावर मार्गदर्शन महत्वपूर्ण ठरणार आहे. तसेच मृदुला रोहतगीयांचे ओरिएशन हे उद्याच्या सत्राचे आकर्षण राहणार आहे.




**आमदार प्रदीप जैस्वाल यांच्या वाढदिवसानिमित्त दरवर्षीप्रमाणे याहीवर्षी नारळीबाग येथे भव्य रक्त दान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. शिबिराचे आयोजन विश्वनाथ राजपूत यांच्या मार्गदर्शनाखाली सुयोग जैस्वाल, प्रतिक जैस्वाल सोबत शुभम तंगडेलू, निलेश अण्णा परकेल्लु, पंडित धींबर, अमोल खडसे, शेख वाजेद, बाळू बनसोडे आदींचे उपस्थिती होती.**

# ईश्वराच्या प्रति समर्पित मनुष्यच मानवतेची यथार्थ सेवा करू शकतो : माता सुदीक्षाजी

आधुनिक केसरी न्यूज

**सुधाकर जेठे**

**समालखा :** ईश्वराच्या प्रति समर्पित मनुष्यच मानवतेची यथार्थ सेवा करु शकतो आणि एक सच्चा मानव बनून अवघ्या विश्वासाठी कल्याणकारी जीवन जगू शकतो. असे उद्गार निरंकारी सद्गुरु माता सुदीक्षाजी महाराज यांनी 76व्या वार्षिक निरंकारी संत समागमाच्या प्रथम दिनी सायंकाळी सत्संगाच्या मुख्य सत्रामध्ये उपस्थित विशाल मानव परिवाराला संबोधित करताना व्यक्त केले.
तीन दिवसीय निरंकारी संत समागमाचा भव्य शुभारंभ काल 28 ऑक्टोबर, 2023 रोजी निरंकारी आध्यात्मिक स्थल, समालखा येथे झाला असून त्यामध्ये देश-विदेशातून लाखोंच्या संख्येने विशाल जनसागर लोटला आहे. मुंबई व महाराष्ट्रातून सुमारे 2 लाख भक्तगण या समागमामध्ये सहभागी झाले आहेत तसेच एकट्या महाराष्ट्रातून सुमारे 20 हजार सेवादल स्वयंसेवकांनी समागमाच्या सेवांमध्ये भाग घेतला आहे. समाजाच्या विभिन्न वर्गातील व जगभरातील लोकांनी यामध्ये भाग घेतला असल्याने हा संत समागम अनेकतेत एकता व वसुधैव कुटुंबकमचे अनुपम दृश्य बनला आहे. सद्गुरु माताजींनी पुढे प्रतिपादन केले, की सेवा वं समर्पणाची भावना अंगीकारल्यानेच जीवनात शांतीसुखाचा अनुभव येऊ शकतो. जगामध्ये मनुष्य जेव्हा एखाद्या व्यवसाय इत्यादिशी जोडलेला असून तर त्याठिकाणी त्याचे जे समर्पण असते ते भयापोटी किंवा अन्य कारणामुळे असू शकते ज्यामुळे शांती प्राप्त होऊ शकत नाही. भक्ताच्या जीवनात वास्तविक समर्पण प्रेमभावाने स्वतःला ईश्वराच्या प्रति समर्पित केल्यानेच येऊ शकतो. खरं तर असे समर्पणच मुबारक होय. सद्गुरु माताजी ही बाब अधिक स्पष्ट करताना म्हटले, की एखादी वस्तु, मान-प्रतिष्ठा किंवा उपाधिच्या प्रति जर आपली आसक्ती जोडली असेल तर आपल्या अंतर्मनात समर्पण भाव उत्पन्न होऊ शकत नाही. परमात्माशी नाते जोडल्यानंतरच आत्म्याला आपल्या निजस्वरूपाचा बोध होतो ज्यामुळे तो केवळ भौतिक वस्तूच नव्हे तर आपल्या शरीराच्या प्रतिदेखील अनासक्त भाव धारण करु लागतो. शेवटी सद्गुरु माताजींनी सांगितले, की जेव्हा आपण या कायम दायम निराकार प्रभूची ओळख करुन प्रेमभावनेने युक्त होऊन या परमात्म्याची निरंतर आठवण ठेवू त्यावेळी आपल्या जीवनात सुख, शांती, समाधान आपसूकच नांदू लागते. या रॅलीमध्ये सेवादल स्वयंसेवकांकडून शारीरिक कवायतीचे प्रदर्शन करण्यात आले आणि मिशनच्या शिकवणूकीवर आधारित लघुनाटिकांच्या माध्यमातून सेवेच्या विविध पैलूंवर फारच रोचक पद्धतीने प्रकाश टाकला. या व्यतिरिक्त मानवी मनोरे इत्यादि विविध धाडसी खेळ सादर केले. तसेच विविध खेळांच्या माध्यमातून सेवेचे महत्व तसेच सेवेमध्ये बाळगण्याची सजगता इत्यादिचे प्रदर्शन केले. शेवटी, बॅण्डच्या तालावर सेवादल सदस्यांनी सद्गुरु माताजींच्या समोरुन मार्च पास्टच्या माध्यमातून सद्गुरु प्रणाम करुन आपल्या हृदयसम्राट सद्गुरुंच्या प्रति आदर-सन्मान व्यक्त केला. सेवादल रैलीला संबोधित करताना सद्गुरु माताजी म्हणाल्या, की समर्पित भावनेने केली जाणारी सेवाच स्वीकार्य असते. जिथे कुठेही सेवेची आवश्यकता असेल त्यानुसार सेवेचा भाव मनात ठेवून जेव्हा आपण सेवेमध्ये भाग घेतो तेव्हा ती सेवेची शुद्ध भावनाच महान सेवा गणली जाते. जर आपल्याला सातत्याने एकसारखी सेवा मिळत असेल तर ती केवळ एक औपचारिकता न समजता पूर्ण तन्मयतेने करायला हवी. कारण जेव्हा आपण सेवाभावनेने सेवा करु तेव्हा ती कोणत्या ठिकाणी आहे याचे महत्व उरत नाही. जेव्हा आपण अशा प्रकारे सेवा करतो तेव्हा त्यामध्ये निश्चितच मानव कल्याणाचा भाव निहित असतो. या अगोदर सेवादलचे मेंबर इंचार्ज पूज्य श्री विनोद वोहराजी यांनी समस्त सेवादलाच्या वतीने सद्गुरु माताजी आणि निरंकारी राजपिताजी यांनी सेवादल रॅलीच्या रूपात प्रदान केलेल्या आशीर्वादांबद्दल कृतज्ञता प्रकट केली.



**सेवादल रैली :** समागमाच्या दुसया दिवसाचा प्रारंभ एका आकर्षक सेवादल रैलीने झाला. या रॅलीमध्ये भारतभरातून व विदेशातूनही हजारोंच्या संख्येने निरंकारी सेवादलाचे बंधु-भगिनी सहभागी झाले. भारतातील पुरुष स्वयंसेवकांनी खाकी तर महिलांनी निळी-श्वेत वर्दी परिधान केली होती तर विदेशातील सेवादल बंधु-भगिनींसाठी निर्धारित केलेली वर्दी त्यांनी परिधान केली होती. दिव्य युगुलाच्या पावन सान्निध्यात आयोजित या सेवादल रॅलीमध्ये सद्गुरु माता सुदीक्षाजी महाराज यांनी शांतीचे प्रतीक असलेला मिशनचा श्वेत ध्वज फडकवला.

# उंबरकोन गावच्या विकासासाठी कायम कटिबद्ध : प्रिया शिंदे

आधुनिक केसरी न्यूज

**इगतपुरी :** तालुक्यातील उंबरकोन ग्रामपंचायतमध्ये प्रिया बाळकृष्ण शिंदे सरपंच पदासाठी निवडणुक लढवित आहे. मौजे उंबरकोन ता. इगतपुरी, येथील होऊ घातलेल्या ग्रा. पं. उंबरकोन निवडणुक २०२३ तें २०२४ च्या सरपंच पदासाठी उमेदवारी अर्ज भरला आहे. तरी सर्व गांवकरी मतदार बंधु-बघिणी व तरुन मित्र मंडळांना त्यांनी नम्र विनंती केली की, गेले अनेक वर्षा पासुन आपल्या गांवात राजकीय मतभेत आहेत. तरी ते मतभेत गांव गुंडी हेवेदावे बाजुला ठेऊन आपण सर्वांनी एकत्रीत येऊन गावच्या सर्वांगीन विकासासाठी एकत्र येऊन गावचा विकास करण्यासाठी मला आपण सहकार्य करावे त्याचप्रमाणे अनेक वर्षा पासुन आपल्या गावांत एकमेकांना तोलातोलीचे राजकारण करत आहेत. हे गांव गुड्डीराजकारन कुठेतरी थांबले पाहीजे या साठी सर्वांनी मला सहकार्य करावे, कारण जर मी सरपंच झाले तर सर्व गावकऱ्यांना एकत्र घेऊन गावचा कारभा करणार आहे. व नवीन निवडुन आलेले सर्व ग्रामपंचायत सदस्य यांना विश्वासात घेऊन गावच्या विकासाचे कामे करणार आहे. तरी सर्व तरुण मित्र गावकरी जेष्ठ नागरीक व महिला यांना पण विश्वासात घेऊन कामे करणार आहे. तरी हेवे देवे बाजुला ठेऊण मला प्रचंड मतांनी विजय करावे हि नम्र विनंती व गांवात विकास कामे करावयाचे खालिल प्रमाणे वचन नामा आपल्या समोर ठेवत आहे.



सर्व खालिल कामे सरपंच झाल्या झाल्या कामांचा धडाका लावणार आहे. व उर्वरीत जे काही कामे गावकरी सांगतील ते कामे शासन दरबारी पाठपुरावा करुन ते पण कामे मार्गी लावणार हा माझा गावकऱ्यांना शब्द आहे. तरी मतदान बंधु-बघिनींनो कोणत्याही लोभांना बळी पडु नका गावचा विकास करायाचा असेल तर विकासाला महत्व दिले पाहिजे. विशेष म्हणजे उंबरकोन ग्रामपंचायत उभ्या असलेल्या उमेदवार या अधिकृत सुशिक्षीत महिला उमेदवार शिंदे प्रिया बाळकृष्ण असून त्यांची निशाणी गॅस सिलिंदर आहे. दरम्यान त्यांनी खालीलप्रमाणे वचननामा केला आहे स्मशानभूमिचा रस्ता खुला करणार, घर पट्टी पाणी पट्टी गरीब गरजू घर मालकांची २५% घर पट्टी माफ करणार, दलित वस्तीसाठी विहिरीपासुन राजवाड्या पर्वत स्वतंत्र पाणी पिण्याचे पाईपलाईन १ महिण्याचे आत करणार, वाड क्र. ०३ देवळाची आळी ह्या गल्लीमध्ये भूमिगत गटार तयार करणार, दलीत वस्ती मध्ये तरुणांना ग्रीन जिम उभारणार, जलजिवन मिशन योजने अंतर्गत जि गावासाठी योजना चालु आहे. त्या योजनेचे काम नवीन विहिरी खोदुन सर्व गावकऱ्यांना विश्वासात घेऊन काम मार्गी लावणार उंबरकोन गावा मध्ये सर्व तरुन मित्र मंडळीला व्यायम शाळा, जिम उपलब्ध करुण देणार पाणी पुरवठा करणाऱ्या विहिरीला फिल्टर प्लॅन्ट बसविणार व शुध्द पाणी गावकऱ्यांना पिण्याचे पाणी उपल्ध करुन देणार पाणी पुरवठा करणाऱ्या विहिरीला व पाण्याच्या टाकीला वॉल कंपाऊंड बांधकाम करुन देणार गावातील गरजुलोकांना घर बांधण्यासाठी नवीन गावठानाची जिल्हा अधिकारी नाशिक यांचे कडे मागणी करणार शेत शिवारातील सर्व रस्ते पानंध योजने अर्तगत खडी करण करुन देणार.उंबरकोन गावासाठी आरोग्य उपकेंद्र उपलब्ध करुन देणार आपले कुल दैवत मारुती मंदीरा समोरील शाळा भरणारे कार्यालय स्थलांतरी करणार. कातकरी समाजासाठी नवीन गावठाण करीता आदिवासी विकास विभाग अंतर्गत भू-संपादना साठी प्रस्ताव सादर करणार अप्पर आयुक्त आ. वि. नाशिक यांचे कडे मागणी करणार गावातील दिव्यंग बाधवांसाठी सागुग्राही अनुदास देणार श्री अध्य क्रांतीकारी महादेव कोळ्यांचे विरपुत्र राघुजी भांगरे यांची गावाला लागुन कमान उभारणार गावातील महिला बचत गटांना ग्रामपंचायत मार्फत शासकीय पातळीवर पाठ पुरवठा करुन अनुदान मिळवुन देणार. आशा प्रकारे सर्व कामे आम्ही गांवच्या विकासासाठी करणार असुन आमचे वर विश्वास ठेऊण मतार बंधु-बघिनींनो आम्हाला तुमची उत्स्फुर्त साथ देऊन प्रचंड मतांनी विजय करावे हि विनंती. गावातील तुटलेले रस्ते पुन्हा नविन कॉक्रीटीकरुण करणार. गावातील आतापर्यंत घरकुलां पासुन वंचित राहिलेले लाभार्थीयांना लाभ देणार. राजवाड्यातील समाज मंदिरावर पत्र्यांचे शेड बांधणार हे सर्व कमे व इतर गावकऱ्यांना सुचविलेले कामे सर्व मार्गी लावणार मागेल त्याला शेत तळे व गोठे देणार.

हिवराळे क्लिनिक
ॲण्ड हर्बल हेल्थ केअर
9130174444
डॉ. के.बी. हिवराळे
आयुर्वेद जनरल फिजिशियन,
ॲक्युपंक्चर तज्ज्ञ
B.A.M.S., N.D.,C.M.S.& Ed(MUMBAI)
R.No.2366/12/2000
एमसीए/2022/10/बी/000839 बॉम्बे नर्सिंग होम परवाना क्र.218, औरंगाबाद
उपलब्ध सुविधा
• जुनाट सांधे दुखी (गुडघे दुखी)
• आम वात उदर रोग
• दमा व ॲलर्जी (जुनाट)
• चिकन गुनिया
• मनोकयीईक आजार
• त्वचा व गुप्त रोग
• स्त्रीयांचे आजार
• स्थूलपणा, मूळव्याध
• वंध्यत्व, संतती प्राप्ती
• कॅन्सर सल्ला, मुतखडा
• वजन वाढविणे
• वजन कमी करणे
• केसांच्या सर्व तक्रारी
• लहान मुलांची
• स्मरणशक्ती वाढविणे
पंचकर्म सुविधा (मुख्यकार्य) 1) वमन, 2) विरेचन, 3) बस्ती, 4) नस्य, 5) रक्तमोक्षन

अजिंठा रोड, सारा कॉलनी, फुलंब्री, ता. फुलंब्री, जि. औरंगाबाद

# निरेच्या आंदोलनातून मांडल्या आक्रमक भूमिका

## आरक्षण मिळणे शक्य असल्याच्या व्यक्त केल्या भावना

आधुनिक केसरी
सुशिल गायकवाड

सकल मराठा समाजाच्या वतीने पुरंदर तालुक्यातील निरा-शिवतक्रार येथे मराठा आरक्षणाच्या पार्श्वभूमीवर तसेच मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनाला पाठींबा देण्यासाठी दि.२ नोव्हेंबर रोजी पुणे-पंढरपूर हा रस्ता अडविण्यात आला. या रास्ता रोको दरम्यान एक मराठा लाख मराठा, जय भवानी जय शिवाजी, छत्रपती शिवाजी महाराज की जय, छत्रपती संभाजी महाराज की जय असा जयघोष करण्यात आला. यावेळी अनेकांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. काहींनी आक्रमक भूमिका घेत सरकारचा निषेध केला. शिवाय काही दाखले देत आम्हाला आरक्षण नसल्याने कशा पध्दतीने तोटा झाला याबाबत परिस्थिती सुद्धा मांडली. दत्ता आबा चव्हाण, तेजश्री काकडे, विद्या निगडे, समृद्धी देशमुख, नम्रता कामत, राजेश काकडे, विराज काकडे,संदीप धायगुडे, दादा गायकवाड, अमोल साबळे, दिलीप थोपटे, अंकुश जगताप, वैभव कोंडे यांच्यासह अनेकांनी आक्रमक भूमिका मांडत आरक्षण मिळणे शक्य असल्याच्या भावना व्यक्त केल्या. हे आंदोलन यशस्वी करण्यासाठी महेश जेधे, दयानंद चव्हाण, सुभाष जेधे, सचिन मोरे, टिके जगताप यांच्या सह सकल मराठा बांधवांनी विशेष प्रयत्न केले.

### हे आरक्षण आपल्याला मिळालंच पाहिजे-



जो शेतीच्या जीवावर अवलंबून आयुष्यभर जगला. इतरांचा पोशिंदा म्हणून राहिला. आज त्याची अवस्था फार दुबळी झाली आहे. मी ही दुबळा झालो कमजोर झालो आहे, अशा भावना त्याच्या मनामधून निर्माण होऊ लागलेल्या आहेत. त्यावेळी हा महाराष्ट्र उठून उभा राहिलेला आहे. जरांगेंचा आत्मा हा तुमचा माझा आत्मा आहे. हे आरक्षण खूप महत्वाचे आहे.पुढच्या पिढीला जगवण्यासाठी हे आरक्षण आपल्याला मिळालंच पाहिजे. घटनेत बाबासाहेबांनी सुध्दा सांगितलं होतं समतेचा मूलभूत पाया हा आरक्षणात आहे.समाजापासून काही माणसं लांब असतील, त्यांना आपल्या बरोबर आणायचं असेल तर आपण त्याला ताकत द्यायला पाहिजे.

*दत्ताआबा चव्हाण, माजी आरोग्य बांधकाम सभापती पुणे जिल्हा परिषद*

### त्यांना काहीही फरक पडत नाही-



हे सरकार कुठल्या घमंडीत आहे. कदाचित त्यांना आपली गरज असते. तर त्यांनी आपल्याला आरक्षण दिलं असतं. परंतु आज ईव्हीएम मशीन जी आहे. ते त्या घमंडीत आहेत. की महाराष्ट्र राज्य झालं, मणिपूर झालं, जिथं हिंसाचार झाला तिथं हॅक नाही करायच्या परंतू आपण भविष्यात बॅलेट पेपर वर मतदानाची मागणी केली पाहिजे. हा खूप महत्वाचा मुद्दा आहे.नाहीतर लाख लोकं आली, बसली त्यांना काही फरक पडत नाही. कारण त्यांच्या कडे हॅकर असतील.

*-सचिन मोरे, सामाजिक कार्यकर्ते.*

### आम्हाला टोकाचं पाऊल घ्यायला भाग पाडू नका-



एवढच सांगायचं आहे की, लाखोच्या संख्येत शांततेने मोर्चे निघत आहेत. आम्ही मराठा समाज शांत आहोत. विनाकारण आम्हाला टोकाचं पाऊल घ्यायला भाग पाडू नका. सरकारला एकच विनंती आहे की, जरांगे पाटील यांनी स्वतःचं सर्वकाही विकून मुलांच्या शिक्षणासाठी सर्व काही त्याग करून ते उपोषणाला बसलेले आहेत. उद्या त्यांच्या जीविताला काही हानी झाली. तर सर्व सकल मराठा समाज हा एकवटून काही विद्रुप गोष्टी घडू नयेत. जाळपोळ असेल किंवा आम्हाला टोकाची भूमिका घ्यायला लावू नका. जे आमच्या हक्काचे आहे ते आम्ही मागत आहोत. ते देण्यासाठी तुम्ही कुठेही मागे सरकू नका.

*तेजश्री काकडे, सरपंच निरा-शिवतक्रार.*

### खरंतर आरक्षण मागायला खूप उशीर केला



खरंतर शिवाजी महाराजांच्या काळापासून आपल्या मराठयांना सवयच लागलेली आहे की, फक्त देत राहायचं. त्यामुळे आपण खरंतर आरक्षण मागायला खूप उशीर केला. हा महाराष्ट्र शाहू फुले आंबेडकर यांचा आहे.या सर्वांनी त्या काळात त्या लोकांवर अन्याय होत होता. म्हणून त्या अन्याया विरुद्ध त्यांनी आवाज उठविला. शिवाजी महाराज फक्त देत गेले. आपल्या बरोबर अठरा पगड जातींच्या लोकांना बरोबर घेऊन त्यांनी स्वराज्य निर्माण केलं. ते अजरामर झाले. परंतु आपण मराठे सगळं देत देतच अजून पर्यंत राहिलो. खरंतर लोकसंख्या वाढलेली आहे.आपण अल्पभूधारक झालेली आहोत, समाजाला जमिनी सुध्दा थोडी थोडी मिळत आहे. शेतकऱ्यांनी सुद्धा कसं जगायचं ना? म्हणून तर त्यामुळे आरक्षणाची खूप गरज आहे.

*-नम्रता कामतकर*

### एका तासाच्या आतमध्ये आरक्षण दिलं



आरक्षण देणं फार खूप मोठी गोष्ट नाही. मी आरक्षणाचा खूप अभ्यास केला आहे. मी याच्यावर दोन दिवस बोलू शकतो. कुणबी म्हणून मराठ्यांना दाखले देणे हे फक्त शासनाने जर ठरविले, मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्र्यांनी ठरविलं तर एका तासाच्या आत मध्ये आरक्षण दिलं जाऊ शकतं. परंतु यांना हे द्यायचंच नाही. गेली पन्नास वर्षे संघर्ष सुरू आहे. परंतु कुठल्याही राजकीय पक्षाने यासंदर्भात कसलंही काम केलेलं नाही. कारण प्रत्येकाला आपलो व्होट बँक सांभाळायची आहे. मराठयांना आरक्षण दिले तर मग बाकीचे नाराज होतील. मतदार निघून जाईल. म्हणून मराठा हा आपलाच आहे. मराठ्यांना गृहीत धरलं जातं. गेली पन्नास वर्षात कुणीही मराठ्यांची बाजू घेतलेली नाही.

*-वैभव कोंडे (सामाजिक कार्यकर्ते)*

### सगळे एका माळेचे मणी आहेत-



तुम्ही सर्वांनी राजीनामे द्या, केंद्रसरकार जर तुमचं ऐकत नसेल तर महाराष्ट्र सरकार बरखास्त होऊ द्या, दोन मिनिटांत तिथे केंद्र सरकार जागे होईल. इथे टोलवा टोलवी सुरू आहे. पाठिमागच्या काळा मध्ये फडणवीस यांनी इलेकशनमध्ये सर्वांना आश्वासन दिले. पहिल्या कॅबिनेट मध्ये तुम्हाला आरक्षण देऊ. सगळे एका माळेचे मणी आहेत. प्रत्येक आमदार खासदारांच्याकडे ओबीसींचे प्रमाणपत्र आहेत. त्यांचं कुठलंही नडत नाही. ते लाभ घेत असतात. इशेक्शनला सुध्दा फायदे घेतात. त्यामुळे त्यांना सर्वसामान्यांच काही देणंघेणं नाही. जरांगे पाटील जो निर्णय घेतील त्या प्रमाणे आपल्याला चालायचं आहे.

*-अनिल चव्हाण, ग्रामपंचायत सदस्य निरा-शिवतक्रार*

### समाज हा ठराविक पक्षाच्या पाठिमागे राहणे ही एक घातक लोकशाही



समाज हा वाटला गेला आहे. प्रत्येक पक्षाची मक्तेदारी ही प्रत्येक समाजाने घेतलेली आहे. सगळेच पक्ष हे धर्मांध आहेत. मी कुठल्याच पक्षावर टिका करत नाही. मी एक निश्चित सांगतो. ठराविक समाज हा ठराविक पक्षाच्या पाठिमागे राहणे ही एक घातक लोकशाही आहे. तुम्ही जोपर्यंत सांगत नाही. आम्ही कुठल्याही राजकीय पक्षाचे नाही. तो पर्यंत आम्हांला आरक्षण मिळत नाही.प्रत्येक गावांत मराठ्याचेच नेतृत्व एकमेकाच्या विरोधात लढत असतं. त्यामध्ये मराठा समाज आपोआपच वाटला जातो. त्यामुळे कुठल्याही प्रकारचं आरक्षण दिलं किंवा नाही दिलं तरी त्याचा काही ही फायदा होणार नाही.ही एक नालायक कल्पना राज्यकर्त्यांच्या मनात असल्या कारणाने हा आरक्षणाचा पेच मोठ्या प्रमाणात झालेला आहे.

*राजेश काकडे, उपसरपंच निरा-शिवतक्रार*

### आंदोलनाचं आणि संविधानाचं आमचं नातं आहे



या आंदोलनाला महाराष्ट्रातून आंबेडकरी चळवळीतल्या सर्व नेतृत्वांनी पाठींबा दिला आहे. हे लोकशाही राज्य आहे. लोकांनी लोकांसाठी चालविलेले लोकशाही राज्य आहे. अनेक वर्षांपासून मराठा समाजाचं आरक्षणा साठी आंदोलन चाललं आहे. परंतु लोकशाही चालविणाऱ्या लोकप्रतिनिधींना ते समजत नाही. जरांगे पाटील यांनी आंदोलन उपोषण न करता लोकप्रतिनिधींना उपाशी कसं ठेवता येईल, मराठा समाजाला आरक्षण कसं देता येईल यावर आंदोलन उभारावं. फुले शाहू आंबेडकर विचारांची चळवळ, मानवहिताची चालवत असताना आम्ही रोडवरती आंदोलन केली. आंदोलनाचं आणि संविधानाचं आमचं नातं आहे. ज्या ज्या वेळी आंदोलनाची तुमची दिशा ठरेल त्या त्या वेळी सर्व समाज तुमच्या समवेत हाताला हात आणि खांद्याला खांदा देऊन काम करेल.

*-दादा गायकवाड, बौद्धाचार्य*

### कायदा पास करा

मनोज जरांगे पाटील यांनी जी ठिणगी छोट्याशा गावातून पेटवली, ती संपूर्ण महाराष्ट्रामध्ये नाहीतर



भारतामध्ये या घटनेची नोंद घेतली जाईल .घटना दुरुस्ती होऊन कुणाचंही आरक्षण न घेता आमच्या मराठा बांधवांना आरक्षण द्यावं ही आमची मागणी आहे. मला एकच सांगणे आहे की, माननीय आदरणीय एकनाथ शिंदे एका रात्रीत बंड केला, अजितदादा एका रात्रीत बंड करून गेला पण एका रात्रीत सगळं तुम्ही खासदार आमदार घेऊन दिल्ली संसदभवनमध्ये मोदीकडे जावा.

*अमोल साबळे, अध्यक्ष-भीम सामाजिक विकास प्रतिष्ठान*

आधुनिक केसरी जनचर्चा






मांडणी व सजावट
अतुल खंडागावकर



या आंदोलनात निरा शिवतक्रार पंचक्रोशीतील गावांनी सहभाग घेतला. तसेच इतर समाज घटकांनी विशेष पाठींबा दर्शविला. आंदोलनाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन कुलदीप पवार यांनी केले. यावेळी पुरंदर-भोरचे उपविभागीय पोलीस अधिकारी तानाजी बरडे, जेजुरी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक बापूसाहेब सांडभोर, सहाय्यक पोलीस निरीक्षक मनोज नवसारे यांच्या सह पोलीस कर्मचाऱ्यांनी चोख बंदोबस्त ठेवला होता.

# दुसरबिडच्या सरपंचपदी राष्ट्रवादीच्या सरस्वती मखमले

आधुनिक केसरी न्यूज

**सिंदखेडराजा :** बुलढाणा जिल्ह्यातील सिंदखेड राजा तालुक्यात असलेल्या सर्वात मोठ्या ग्रामपंचायतींच्या यादीत मानल्या गेलेल्या दुसरबिड येथे १७ सदस्य असलेल्या ग्रामपंचायतच्या सरपंच व उपसरपंच पदासाठीच्या राजीनामा भोवती दुसरबीड येथील राजकीय वातावरण तापले होते. बहुमतात असलेल्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या १३ सदस्यांमध्ये दोन गट पडल्याने दिनांक १ नोव्हेंबर रोजी दुपारी सरपंचपदाच्या निवडणूकीसाठी दोघांचे अर्ज प्राप्त झाल्यानंतर १० विरूद्ध ७ असे मतदान झाले. दरम्यान सौ.लक्ष्मी कृष्णा जऱ्हाड यांना ७ तर सौ.सरस्वती शरदराव मखमले यांना १० मते मिळाली. यामुळे सौ.सरस्वती शरदराव मखमले यांना सरपंच म्हणून घोषित करण्यात आले.
दि.२५ ऑक्टोबर रोजी जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशानंतर तहसीलदार यांच्या मार्गदर्शनाखाली दि.१ नोव्हेंबर रोजी दुपारी १ वाजेपर्यंत सरपंचपदासाठी विशेष सभा बोलावून अर्ज मागविण्यात आले होते.
त्यानंतर दुसरबीड सरपंच निवडणूक अध्यासी अधिकारी म्हणून एस.एस.साळवे यांनी सभेपूर्वी सकाळी १० ते १२ वाजेपर्यंत नामनिर्देशन पत्र दाखल करण्यास वेळ दिला होता. या कालावधीमध्ये सौ.लक्ष्मी कृष्णा जऱ्हाड व सौ.सरस्वती शरदराव मखमले यांचे दोन अर्ज प्राप्त झाले होते. दुपारी २ वाजता कोरम पुर्ण असल्याने सभेला सुरुवात करण्यात आली. यावेळी अध्यासी अधिकारी साळवे यांनी नामनिर्देशन पत्राची छाननी करून सौ. लक्ष्मी कृष्णा जऱ्हाड व सौ.सरस्वती शरदराव मखमले यांचे दोन्ही अर्ज वैध असल्याचे सांगितले. त्यामुळे निवडणुकीसाठी उमेदवार म्हणून जाहीर करत उमेदवारी अर्ज मागे घेण्यासाठी वेळ दिला. परंतू कोणीही अर्ज मागे न घेतल्याने सरपंच पदाच्या निवडीसाठी दोन अंतिम उमेदवार म्हणून जाहीर करण्यात आले. त्यानंतर मतदान घेण्या करिता हात वर करून मतदान घेण्यासाठी विचारणा



केली असता, लक्ष्मी जऱ्हाड यांनी लेखी अर्ज सादर केल्याने गुप्त मतदान घेण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली. यासाठी मतपत्रिका तयार करत चिन्ह देवून गुप्त मतदान प्रक्रिया घेण्यात आली. दरम्यान उपस्थित १७ सदस्यांचे गुप्त मतदान घेतले असता सौ.लक्ष्मी कृष्णा जऱ्हाड यांना ०७ मते मिळाली तर सौ.सरस्वती शरदराव मखमले यांना १० मते मिळाली. त्यामुळे ग्रामपंचायत दुसरबीड सरपंच म्हणून सौ.सरस्वती शरदराव मखमले यांना घोषित करण्यात आले.
यावेळी मोइनअली शेख,अरूण मखमले, शरदराव मखमले,सतिष काळे, सिताराम चौधरी, गजानन देशमुख, गजेंद्र देशमुख, वैभव देशमुख, तलाठी राहुल देशमुख, सहाय्यक पोलीस निरीक्षक युवराज रबडे यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती.

# बहाद्दरपुराच्या श्री विठ्ठल रुक्माई मंदिरात होणार नवीन मूर्तीची प्राणप्रतिष्ठा

## भाविक भक्तांनी उपस्थित राहावे

आधुनिक केसरी न्यूज

**कंधार :** येथील बहाद्दरपुराच्या पंच क्रोशीतील प्रसिद्ध असलेल्या श्री विठ्ठल रुक्माई मंदिर हे अति प्राचीन मंदिरात धनत्रयोदशीच्या शुभ मुहूर्तावर सकाळी अकरा वाजता नवीन मूर्तिची प्राण प्रतिष्ठा होणार आहे. या धार्मिक कार्यक्रमास परिसरातील भाविक भक्तांनी उपस्थित राहावे असे आवाहन करण्यात आले आहे. प्रसिद्धी पत्रकात पांडुरंग भक्तांना विनम्र प्रार्थना करण्यात येते कि, कंधार येथील बहाद्दरपुराचे श्री विठ्ठल रुक्माई मंदिर हे अति प्राचीन मंदिर असून मूर्ती जीर्ण झाल्याने 17 सप्टेंबर रोजी जुन्या मूर्तिचे विधिवत होम हवन, भजन पूजन करून मन्याड नदी पात्रात विसर्जन करण्यात आले. सदरील मंदिरासाठी हिंदू मुस्लिम व सर्व जाती जमातीच्या भाविक भक्तांनी आपली सेवा रुजू केली आहे. मुस्लिम समाजाचे पैगंबर वासी मेहताब बुवा, मातंग समाजाचे कै गोविंदा साधू गायकवाड, माळी समाजाचे कै जीवबा माळी वंजे, निराळी समाजाचे कै जयवंतराव कुरुडे, कै. सुभद्राबाई माणिकराव कुरुडे, मुन्नरवारलू समाजाचे




कै जयवंता साधू तोटावाड आदिच्या विठ्ठल सेवेचा आम्ही आदराने उल्लेख करणे आमचे परम करतव्य समजतो. दि 10नोव्हेंबर शुक्रवारी धनत्रयोदशीच्या शुभ मुहूर्तावर सकाळी अकरा वाजता नवीन मूर्तिची प्राण प्रतिष्ठा सोहळा होम हवन भजन, पूजनाने आयोजिले आहे. तसेच मूर्तिचे पालखीतून ग्राम प्रदक्षिणाही जल्लोषात आयोजित केली आहे. यात पुरुष महिला बालका सह हजारो भक्त गण सहभागी होणार आहेत. या आनंद सोहळ्यात लोकप्रिय मा. आ. गुरुनाथराव कुरुडे, श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा पुरुषोत्तमजी धोंडगे, मा श्री एकनाथ दादा पवार, कीर्तनकार, नामवंत भजन गायक आदींची उपस्थिती लाभणार आहे. मूर्ती प्राण प्रतिषठे नंतर लगेचच सर्वांनी महाप्रसादाचे आयोजन केले आहे. तरी सर्व भाविक भक्तांनी हा धार्मिक सोहळा आनंददायी बनवण्यासाठी हजारोच्या संख्येने बहाद्दरपुरा येथे उपस्थित राहून सहकार्य करावे. ज्या भाविकांना स्वेच्छेने देणगी द्यावयाची आहे त्यांनी बँक ऑफ बडोदा खाते क्र 78860100018311व मोबाईल पे द्वारा 9890686000 या क्रमांकावर तसेच प्रत्यक्ष मंदिरात जाऊन देणगी द्यावी. अशी प्रार्थना मंदिर प्रतिष्ठान तर्फे करण्यात येत आहे. या धार्मिक सोहळ्यास सर्वानी आवर्जून उपस्थित राहून शोभा वाढवावी असे आवाहन राम अय्यर अध्यक्ष विठ्ठल रुक्माई प्रतिष्ठान, वेंकट महाराज अय्यर, सचिन तानाजी पाटील पेठकर,गणेशराव सावरकर, दिगंबर पेठकर, गणेशराव अय्यर, गणपत माधवराव पेठकर, प्रकाश कुरुडे, सुरेश सूर्यकर गुरुजी, लक्ष्मीकांत अय्यर, बसवेश्वर पेठकर, तानाजी कुरुंदे, भजने धोंडिबा पा पेठकर देवराव कदम, निवृती गायकवाड, आदींसह सर्वानी केलं आहे.

# सापाचा दंश; साप घेऊनच गाठले रुग्णालय

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** अमरावती रोडवरील सातनवरी गावातील फार्म हाऊसवर जमिनीवर झोपलेल्या वृद्धेला विषारी साप चावला. तिच्या पतीने काठीने सापाला ठार मारले. त्यानंतर प्रथम जवळचे रुग्णालय आणि त्यानंतर नागपुरातील मेडिकल रुग्णालय गाठले. वृद्धेने पिशवीतून मेलेला साप दाखवताच डॉक्टर थक्कच झाले. महिलेवर उपचार सुरू असून तिची प्रकृती गंभीर आहे.
मीनाबाई कलम ( वय – ६२ ) असे सर्पदंश झालेल्या महिलेचे नाव आहे. मीनाबाई आपल्या पतीसोबत अमरावती रोडवरील सातनवरी गावातील फार्म हाऊसवर काम करतात, पती-पत्नी दोघेही फार्म हाऊसच्या परिसरातील झोपडीत राहतात. ३१ ऑक्टोबर रोजी झोपडीत ते जमिनीवर झोपले होते. रात्री १०:४५ वाजताच्या सुमारास मीनाबाई यांना साप चावला. आरडाओरड केल्याने त्यांचे पतीही जागे झाले. त्यांना ४ फूट साप दिसला.



त्यानंतर पतीने शेजाऱ्यांच्या मदतीने सापाला काठीने ठार केले. त्यानंतर पती आणि मीनाबाईच्या बहिणीने त्यांना वानाडोंगरी येथील खासगी रुग्णालयात दाखल केले. मात्र, रुग्णालयाने आधी १० हजार रुपये जमा करण्याची अट घातली. परंतु पैसे नसल्याने रुग्णाला सर्पमित्राच्या मदतीने मेडिकल रुग्णालयात हलवले गेले. यावेळी महिलेने आपल्या सोबत प्लास्टिकच्या पिशवीत मृत सापालाही आणले. साप पाहून काही वेळेसाठी खळबळ उडाली. डॉक्टरांनी मृत साप हा विषारी असल्याचे ओळखून त्या दृष्टीने उपचाराला सुरुवात केली.

# तंटामुक्त अध्यक्षपदी शालिग्राम भगत

आधुनिक केसरी न्यूज

**जळगांव जा. :** जळगाव जामोद तालुक्यातील असलेला



सुनगाव येथील तंटामुक्ती अध्यक्ष अमोल येऊल यांच्या राजीनामा यामुळे रिक्त झालेल्या जागेवर दिनांक एक नोव्हेंबर रोजी पार पडलेल्या ग्रामसभेमध्ये तंटामुक्ती अध्यक्ष पदी शालिग्राम गंगाराम भगत यांची अविरोध नियुक्ती करण्यात आली.
शालिग्राम भगत यांचे सामाजिक कार्यात मोठे योगदान असून त्यांनी ग्रामपंचायत सदस्यत्व सुद्धा मिळविले होते तसेच ते श्री आवजीसिद्ध महाराज संस्थानचे सदस्य सुद्धा आहेत. त्यांनी यापूर्वी ग्रामशिक्षण समितीचे अध्यक्ष पद भूषविले आहे. त्यामुळेच त्यांची महात्मा गांधी गाव तंटामुक्त अध्यक्षपदी गावकऱ्यांनी त्यांची अविरोध निवड केली आहे. सुरुवातीस तीन नावे आली होती परंतु शालिग्राम भगत यांचे नाव त्या ठिकाणी आल्याने इतर दोघांनी आपले अर्ज मागे घेतले त्यामुळे शालिग्राम भगत यांची गाव तंटामुक्त समितीचे अध्यक्षपदी निवड करण्यात आली. तसेच यावेळी पत्रकार सदस्य म्हणून गजानन सोनटक्के यांचीही निवड करण्यात आली. या ग्रामसभेला सरपंच सचिव अंगणवाडी सेविका पत्रकार माजी सरपंच ग्रामपंचायत सदस्य यांच्यासह गावातील नागरिक मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

# अपुऱ्या पावसाअभावी रब्बी पिकात घट

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :**तालुक्यात यंदा पन्नास टक्के पेक्षाही कमी पाऊस पडल्याने खरिप बरोबरच रब्बी हंगाम अपुऱ्या पावसामुळे न येण्याचे चिन्ह आहे. गतवर्षाच्या सरासरीत यंदा वर्ष २०२३मधे पन्नास टक्के ही पाऊस न पडल्याने खरिप पिक हंगाम बरोबरच रब्बी पिक हंगाम वाया जाण्याच्या मार्गावर आहे. खरिप पिक हंगामातील मुग उडीद चवळी आलेच नाही तर कापुस मका बाजरी सोयाबीन भुईमूग तूर पिकांची दुरावस्था आहे. खरिप पिकांतील मका बाजरी सोयाबीन भुईमूग तूर जेमतेमच आली कारण पावसाने ऐनवेळी दडी खंड दिल्याने पुरेसा पाऊसा अभावी पिकांच्या वाढीवर फुले कैऱ्या कणसात दाने भरणे यावर परिणाम झाला तर कापसावर लाल्या पडला पुर्वीच फुले कैऱ्या ची लागण नव्हती त्यात लाल्या रोगाचे प्रदुर्भाव यात कापसाची वाटलागली. त्यात आज उद्याच्या भरवशावर पावसाळा संपला तरी पुरेसा पाऊस झाला नाही.व समोर रब्बी पिक हंगाम उभे राहिले असेतसे खरिप पिके काढुण रब्बी पिकासाठी तयारी केली खरी परंतु अपुरा पाऊस त्यात परतीच्या पावसाने पाठ फिरवली.

# खुलताबाद तालुका दुष्काळातून वगळला

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** तालुक्यात यंदा अपुरा पाऊस वा सरासरीच्या अर्धेही पाऊस झाले नाही.खरिप पिक हंगामाबरोबरच रब्बी पिक हंगामही यंदा शेतकऱ्यांच्या हाती येत नाही.व अपुऱ्या पावसामुळे खरिप पिकांना फटका बसला आहे व तालुक्याची ४८पैसेवारी असताना सरकारकडुन खुलताबाद तालुका दुष्काळातून वगळले असल्याने शेतकऱ्यांत निराशा पसरली आहे.यंदा जुन पासुन पावसाला सुरवाती झाली खरी परंतु सुरवाती पासुनच पावसात जोर नव्हता जेमतेम पावसावरच खरिप पिकांची वाढ झाली. आज उद्या पाऊस येईल या भरवाशावर पावसाळा संपला. अपुऱ्या पावसामुळे यंदा नदी नाले ओढे तलाव कोरडेच पडून आहे. जुनमधेच पावसाने अखडतं घेतल्याने मुग उडीद चवळी पेरा ला उशीर झाला त्यातही पावसाने हुलकावणी दिल्याने मुग उडीद चवळी हातीच आले नाही.तर मका कापूस सोयाबीन बाजरी भुईमूगची तुर अपुऱ्या पावसामुळे वाढ झाली नाही. जेमतेम पाऊस त्यात ऐनवेळा म्हणजे फुलाऱ्यात कणसात दाने भरता वेळा व फुल कैऱ्या वेळा पावसाने खंड दिल्याने खरिप पिकाची वाट लागली.व महागडी बि बियाणे खते औषधी मजुरी खर्च करून ही शेतकऱ्यांच्या हाती काहीच येत नसल्याने शेतकरी मेटाकुटीला आला व हतबल परेशानच्या स्थीतीत असताना त्याला दुष्काळ जाहीर झाले तर काही हाती पडेल असी आशा होती.जर दुष्काळ जाहीर झाले तर कमीतकमी सवलती मिळतील असी आशा असतांना त्यां आशावर पाणी फिरले व जिल्ह्यात दोनच तालुके छत्रपती संभाजी नगर व सोयगाव दुष्काळी म्हणून जाहीर झाले.व खुलताबाद तालुक्यातील शेतकऱ्यांचे तोंडाचे पाणी पळाले व सर्वत्र निराशा पसरली आहे.

गुप्तरोगाबाबत काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in